# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 35) 15 th November 2010 ( No : 10


# प्रा.बी.टी.देशमुख यांना विजयी करा

## *नुटा, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व विज्युक्टाचा निर्णय*

नागपूर दि. २९ ऑगस्ट २०१० : नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटाच्या) कार्यकारी मंडळाने विधानपरिषदेवर एक सदस्य निवडण्यासाठी **अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून** सन २०१० मध्ये होणाऱ्या निवडणूकीत संघटनेचे अध्यक्ष **प्रा.बी.टी.देशमुख** यांना अधिकृत उमेदवार म्हणून उभे करण्याचे ठरविले असून विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या आमसभेने त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशनच्या (विज्युक्टा) कार्यकारी मंडळानेही प्रा.बी.टी.देशमुख यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून प्रा.बी.टी.देशमुख यांना पसंतीचा प्रथम क्रमांक (१) देवून निवडून आणण्यासाठी सर्व शिक्षक संघटनांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, तसेच प्रगतिशील विचारांच्या संघटनांनी आणि सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा द्यावा, अशी विनंती करण्यात येत आहे.

**श्री.वसंतराव खोटरे** : **डॉ.एकनाथ कठाळे**

*अध्यक्ष, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ* *सचिव, नुटा*

**श्री.अरूण चौधरी,** अध्यक्ष **श्री.साहेबराव मांजरे,** महासचिव

विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशन (विज्युक्टा)

# प्रा.बी.टी.देशमुख यांची पदवीधर मतदारांना विनंती

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर एक सदस्य निवडून देण्यासाठी शनिवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०१० रोजी निवडणूक होत आहे. नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचा (नुटा) अधिकृत उमेदवार म्हणून मी या निवडणूकीत उभा आहे.

"गेली ३० वर्षे विधानपरिषद सदस्य या नात्याने मी काम करीत आहे. विविध व्यवसायातून काम करणाऱ्या व्यावसायिकांच्या हितसंबंधांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे दमदार व जोमदार व्यासपीठ म्हणून मी माझ्या सदस्यत्वाचा उपयोग केलेला आहे. सर्व स्तरावरील शिक्षक, कर्मचारी, अधिकारी, प्राध्यापक, प्राचार्य, पदवीधर व अभियंते यांचे प्रश्न मी त्या व्यासपीठावरून प्रभावीपणे मांडले आहेत. त्याच बरोबर जलसिंचन, नागरी पाणीपुरवठा, रस्ते, उद्योग या विकासक्षेत्रातील अनुशेष विषयक प्रश्न मी सर्व शक्तीनिशी त्या व्यासपीठावरुन मांडले आहेत. याशिवाय विदर्भातील विविध स्वरूपाचे अनेक शैक्षणिक, आर्थिक, कृषिविषयक, सामाजिक, सांस्कृतिक व अनुशेष विषयक प्रश्न सोडविण्यासाठी सुद्धा मी त्या व्यासपीठाचा वापर केलेला आहे."

अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून यापूर्वी ज्या ज्या वेळी मी निवडणूक लढविली त्या त्या प्रत्येक वेळी माझा निवडणूक जाहिरनामा उपरोक्त प्रमाणे एका परिच्छेदाचा होता. आजही या निवडणूकीतील एक उमेदवार या नात्याने ती वचनबद्धता कायम आहे पण त्याबरोबरच घटनात्मक तरतुदीचा अम्मल होत नसल्यामुळे विदर्भ आज ज्या मानवनिर्मित संकटातून प्रवास करीत आहे ते लक्षात घेता या निवडणूकीसाठी तपशीलवार जाहिरनामा प्रकाशित करण्याचे मी ठरविले आहे. या जाहिरनाम्यातील विचारांकडे, कार्यक्रमाकडे लोकांचे लक्ष वेधावे, त्या त्या विचारांना व कार्यक्रमाला लोकांची मान्यता मिळावी हा यामागील हेतु आहे. प्रादेशिक असमतोलाचे निर्मूलन ही चिवट व दिर्घमुदतीची प्रक्रिया आहे. विषयाचे तपशील लोकांपर्यंत पोचून तो विचार लोकमान्य झाला की समतोलाची स्थापना व्हायला वेळ लागत नाही. भूमिकांना व विचारांना लोकमान्यता मिळविण्याचे निवडणूक हे अधिकृत माध्यम आहे. या श्रद्धेने मी हा निवडणूक जाहिरनामा व त्यावरील तपशीलवार निवेदन सादर करीत आहे. मतदारांनी पसंतीच्या प्रथम क्रम अंकाचे (१) मत मला देवून माझ्या या भूमिकेला पाठिंबा द्यावा ही विनंती.

आपला नम्र,

**बी.टी.देशमुख**

## *मतदानाची तारीख : शनिवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०१०*
## *वेळ : सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत*

# निवडणूक जाहिरनामा

विदर्भ आज ज्या मानवनिर्मित संकटातून प्रवास करीत आहे ते लक्षात घेता या निवडणूकीसाठी तपशीलवार जाहिरनामा प्रकाशित करण्याचे मी ठरविले आहे. या जाहिरनाम्यातील विचारांकडे, कार्यक्रमाकडे लोकांचे लक्ष वेधावे, त्या त्या विचारांना व कार्यक्रमाला लोकांची मान्यता मिळावी हा यामागील हेतु आहे. प्रादेशिक असमतोलाचे निर्मूलन ही चिवट व दिर्घमुदतीची प्रक्रिया आहे. विषयाचे तपशील लोकांपर्यंत पोचून तो विचार लोकमान्य झाला की समतोलाची स्थापना व्हायला वेळ लागत नाही. भूमिकांना व विचारांना लोकमान्यता मिळविण्याचे निवडणूक हे अधिकृत माध्यम आहे. या श्रद्धेने मी हा निवडणूक जाहिरनामा व त्यावरील तपशीलवार निवेदन सादर करीत आहे.

(१) मा. राज्यपालांनी १ जानेवारी २०११ पासून नोकरभरतीमध्ये तीनही विभागांना समन्यायी वाटप प्रदान करणारे निदेश लागू करावे व ३० डिसेंबर २०१० पर्यंतच्या काळातील नोकरभरतीमधील असमतोलाचा अहवाल तयार करण्याचे आदेश द्यावेत व पुढील ३ महिन्यात तो अहवाल जाहिर करावा. (परिच्छेद १४.४)

(२) आर्थिक अनुशेष दुर करण्याचे धोरण कुचकामी व निरर्थक ठरले असून भौतिक अनुशेष निर्मूलनाचे धोरण स्विकारणे आवश्यक झाले आहे तसे निदेश मा. राज्यपालांनी तत्परतेने दिले पाहिजेत. (परिच्छेद १३.६)

(३) महत्तम अनुशेषात असलेल्या अमरावती महसुली विभागात ८८८ हजार हेक्टरचा भौतिक अनुशेष असल्याने तेवढ्या हेक्टरच्या प्रकल्पांचे सर्व्हेक्षण करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे व ती कामे प्रत्यक्ष सुरु करण्याचे निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावे. (परिच्छेद १३.१३)

(४) अशा रीतीने दरवर्षीच्या भौतिक प्रगतीच्या व वाढलेल्या राज्य सरासरीच्या आधारावर दरवर्षीचे प्रत्येक जिल्ह्याचे जलसिंचन अनुशेषाचे चित्र अद्यावत करणे हा मा.राज्यपालांच्या निदेशांचा अपरिहार्य भाग असावा असे आम्हाला वाटते. कायद्याने स्थापित यंत्रणा उपलब्ध असतांना वेगळी समिती नेमण्याचा विचार मा. राज्यपालांनी त्याज्य व टाकावू समजला पाहिजे. ( परिच्छेद १३.८)

(५) जलसिंचन या विकास क्षेत्रात अनुशेषात असलेल्या जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचनीय प्रयोजनासाठी वळविल्यामुळे सिंचन अनुशेष आणखी वाढतो म्हणून तसे करता कामा नये याबाबतचे सक्त निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावेत. ( परिच्छेद १३.९)

(६) जलसिंचन या विकास क्षेत्रासाठी असणाऱ्या वार्षिक तरतुदीतून बिगर अनुशेष जिल्ह्यासाठी १५ टक्के रक्कम राखून ठेवावी व उरलेली ८५ टक्के अनुशेष जिल्ह्यांना अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणारे निदेश राज्यपालांनी तत्परतेने निर्गमित करावेत. ( परिच्छेद १३.१०)

(७) जलसिंचन अनुशेष संपुष्टात येणे तर दुरच राहीले पण तो सतत वाढत आहे, हे लक्षात घेता जलसिंचन असुविधेप्रति सानुग्रह अनुदान देण्याचे निदेश निर्गमित करावे. ( परिच्छेद १३.११)

(८) घटनेने ज्यांच्यावर जबाबदारी सोपविली त्या राज्यपालांनी हतबल होवून चालणार नाही. माझे निदेश का पाळले जात नाही याची नियोजन विभागाने चौकशी करावी असे नुसते म्हणून चालणार नाही. ज्यांच्यावर असमतोल दुर करण्याची विशेष जबाबदारी सोपविली आहे त्यांना घटनेने तसे अधिकार दिलेले आहे. त्या अधिकारांचा त्यांनी वापर करावा. ( परिच्छेद १३.१२)

(९) असमतोल दुर करण्याची घटनेने विशेष जबाबदारी ज्या राज्यपालांवर सोपविलेली आहे. त्यांनी निदेश देतांना मा. पंतप्रधानांनी नेमलेल्या या समितीच्या शिफारसीकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे व दाखविण्यात आलेल्या चूका दुर करण्याचे निदेश द्यावेत. ( परिच्छेद १३.१४)

(१०) प्रादेशिक असमतोल दूर करण्याची विशेष जबाबदारी ज्यांच्यावर सोपविली आहे त्या राज्यपालांनी निदेश देतांना निदान भारताच्या नियंत्रक व महालेखा परिक्षकांचे शेरे, ताशेरे विचारात घ्यावे. ( परिच्छेद १३.१५)

(११) विजेचे उत्पादन राज्याला आवश्यक आहे यात शंका असण्याचे कारण नाही म्हणूनच राज्याच्या सर्व भागामध्ये अशा प्रकल्पांचे समन्यायी वाटप झाले पाहिजे.(परिच्छेद १५.४)

(१२) राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारच्या वापरासाठी विजेचा दरडोई वापर हा समन्यायी असावा, मागणीनुसार विजेचा पडणारा तुटवडा लक्षात घेता विविध क्षेत्रामध्ये किंवा जिल्ह्यामध्ये अशा प्रकारे भारनियमन करण्यात यावे की, सर्व जिल्ह्यामध्ये दरडोई वापर हा समान राहील. (परिच्छेद १५.१)

(१३) त्याचप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी वापरातील विजेचे अशाप्रकारे भारनियमन करण्यात यावे की, विजेचा दर हेक्टरी वापर राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये समान राहील. (परिच्छेद १५.२)

(१४) अती उच्च दाब उपकेंद्र, उच्च दाब वाहिन्या, वितरण रोहीत्रे यासारख्या पायाभूत सोयी विदर्भात ग्राहकांना (वाढीव) वीज पुरवठा करण्यासाठी राज्यातील विकसीत भागाप्रमाणे समतुल्याने उपलब्ध करण्यात याव्या. याबाबतचे निदेश मा. राज्यपालांनी तत्परतेने लागू करावे अशी मागणी करण्यात येत आहे. (परिच्छेद १५.३)

(१५) "उत्तेजनांची लवचिकता" (Flexibility of incentives) ही उद्योगाच्या अनुशेष निर्मुलनात मुख्य उपाययोजना आहे. "चढत्या क्रमाने उत्तेजनांची मात्रा वाढविणे" या धोरणाचा स्वीकार व्हावा. जिल्हा जेवढा उद्योग या विकास क्षेत्रात मागे असेल तेवढी उत्तेजनांची मात्रा वाढवावी लागेल. **"प्रतिलक्ष लोकसंख्येमध्ये उपलब्ध कारखानदारी रोजगार"** या मापदंडानुसार जो जिल्हा राज्यसरासरीवर आला असेल तेथे उत्तेजनांची मात्रा नंतर टप्प्याटप्प्याने कमी होण्याचे निदेश निर्गमित होणे गरजेचे आहे. (परिच्छेद १६.९)

(१६) उद्योगांच्या विकासासाठी कामे करणाऱ्या शासन नियंत्रित वित्त पुरवठा संस्थांनी मागास जिल्ह्यामध्ये ते मागासलेपण दुर होण्यासाठीचे धोरण स्विकारावे असे स्पष्ट निदेश देणे गरजेचे आहे. (परिच्छेद १६.९)

(१७) उद्योगाचा अनुशेष दुर करतांना खूप पाणी गिळणारे व सिंचनाचा अनुशेष वाढविणारे उद्योग अनुशेष ग्रस्त भागात येता कामा नये याबाबत निदेश देवून स्पष्ट बंधने राज्यपालांनी घालुन देणे आवश्यक आहे. (परिच्छेद १६.९)

**प्रा.बी.टी.देशमुख**

**पदवीधर मतदार संघातून लागोपाठ सहाव्यावेळी विधानपरिषदेवर निवडून जाणारा आपला प्रतिनिधी हा असा पहिलाच प्रतिनिधी असेल; पण त्यासाठी आपण मतदान केंद्रावर अगत्यपूर्वक पोहचले मात्र पाहिजे.**

# निवडणूक जाहिरनाम्याचे तपशीलवार निवेदन

### नागपूर कराराची निर्मिती

**१.** देशात राज्य पुनर्रचना होत असतांना महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीची मागणी झाली तेंव्हा विदर्भ व मराठवाडा या तुलनात्मकदृष्ट्या मागास प्रदेशांचे हित संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या तीनही प्रदेशामधील राजकीय नेत्यांनी दिनांक २८ सप्टेंबर १९५३ रोजी "नागपूर करार" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ऐतिहासिक करारावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. या कराराची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे होती. :-

(१) विकासात्मक प्रशासनाच्या सर्व प्रयोजनांसाठी, राज्याची विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन प्रदेशांमध्ये विभागणी करण्यात येईल. या तिनही प्रदेशांसाठी **विकासकामावरील निधीचे नियतवाटप संबंधित प्रदेशाच्या लोकसंख्येच्या आधारे करण्यात येईल.**

(२) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशांना लोकसंख्येच्या आधारे **व्यवसाय शिक्षणाच्या व वैज्ञानिक व विशेष प्रशिक्षण** कार्यक्रम देणाऱ्या संस्थांमध्ये समान संधी देण्यात येतील. या संधीला राज्य शासनाने हमी दिलेली असेल.

(३) राज्य शासनाच्या अखत्यारीतील व राज्य शासनाच्या नियंत्रणातील व **सर्व प्रवर्गामधील सेवांमध्ये** प्रत्येक विभागाला त्या प्रदेशाच्या लोकसंख्येच्या आधारे संधी देण्यात येतील.

या करारावर (१) सर्वश्री बॅ. रामराव देशमुख (२) गोपाळराव खेडकर (३) बॅ. शेषराव वानखडे (४) नानासाहेब कुंटे (५) आर.के. पाटील (६) पी.के.देशमुख (७) देवकीनंदन (८) भाऊसाहेब हिरे (९) यशवंतराव चव्हाण (१०) लक्ष्मणराव भटकर (११) पंढरीनाथ पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### नागपूर कराराला घटनेमध्ये समाविष्ट करण्याचा यशस्वी प्रयत्न

**२.** महाराष्ट्र राज्याच्या या तिनही विभागातील ज्येष्ठ नेत्यांनी केलेला हा करार असला तरी त्या कराराला कायदेशिर असा कोणताही दर्जा नव्हता हे लक्षात ठेवले पाहिजे. मात्र नागपूर कराराच्या कर्त्यांचा थोरपणा असा की, त्यांनी सार्वजनिक जीवनातील आपले वर्चस्व पणाला लावून या करारातील तरतूदींना केवळ कायदेशिर नव्हे तर घटनात्मक स्थान मिळवून दिले. तत्कालीन गृहमंत्री श्री. गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली संसदेच्या उभय सभागृहाने नेमलेल्या राज्य पुनर्रचना विधेयकावरील संयुक्त चिकित्सा समितीसमोर हे नेते उपस्थित झाले व त्यांनी त्या समितीकडे असा जोरदार आग्रह धरला की, **नागपूर करारातील तरतूदींना शक्य होईल त्या प्रमाणात घटनेमध्ये स्थान देण्यात यावे. नागपूर कराराला घटनात्मक आधार देण्याच्या धडपडीतून ३७१ (२) हे कलम घटनेत आले.** राज्यपुनर्रचनेच्या वेळी आणलेल्या विधेयकावर संसदेच्या दोनही सभागृहांची जी उपरोक्त संयुक्त चिकित्सा समिती नेमली होती त्या समितीच्या अहवालामध्ये पुढील उल्लेख आहे :-

"On page 4, original clause 21,--- It was argued before the Committee by its Members from the Vidarbha that the agreement entered into September, 1953 known as Nagpur Agreement should to the extent practicable be given constitutional recognition. The Members from other Maharashtra area gave their full support to this proposal. A new clause has accordingly been added to the proposed article 371 with the consent of the Members from Maharashtra."

### भारताच्या घटनेतील खंड ३७१ (२) ची निर्मिती

**३.** महाराष्ट्र राज्याच्या या तिनही विभागांचा समतोल विकास झाला पाहिजे याची हमी देणारे भारतीय संविधानातील कलम ३७१(२) भारतीय संविधानामध्ये जोडण्यात यावे अशी ह्या समितीने शिफारस केली. पुढे या शिफारशी संसदेच्या उभय सभागृहामध्ये मान्य झाल्यानंतर १९५६ मध्ये ही घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीनंतर घटनेत समाविष्ट झालेले कलम ३७१(२) पुढील प्रमाणे आहे.

**"महाराष्ट्र व गुजराथ या राज्यांबाबत विशेष उपबंध :- ३७१ (२)** : या संविधानात काहीही असले तरी महाराष्ट्र किंवा गुजराथ ह्या राज्यांबाबत आदेश करून त्याव्दारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टींसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपवण्याचा उपबंध करता येईल.

(क) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र किंवा प्रकरणपरत्वे सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजराथ यांच्यासाठी अलग अलग विकास मंडळे स्थापन करून, त्यापैकी प्रत्येक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल अशी तजवीज करणे;

(ख) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रावरील **विकासखर्चासाठी पैशाची समन्यायानुसार वाटणी करणे;** आणि

(ग) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्राबाबत **तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण** यासाठी पर्याप्त सोयी व **राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायानुसार व्यवस्था करणे"**

वैधानिक विकास मंडळांची व्यवस्था ही कलम ३७१ (२) मधील अधिकारांच्या वापरानुसार राष्ट्रपतींनी आदेश काढून स्थापीत करावयाची व्यवस्था आहे. त्यांनी तसे आदेश काढले नाही तर हे "निष्प्रभावी कलम" म्हणून घटनेमध्ये सुस्त पडून रहाणार. भारताच्या राष्ट्रपतींनी १९९४ सालापर्यंत असे आदेश काढले नाहीत हा इतिहास आहे. **त्यामुळे ३७१ (२) हे कलम १९९४ सालपर्यंत "झोपविले" गेले.**

### सत्यशोधन समितीचा अहवाल

४. **"महाराष्ट्रातील विविध विभागांचा समतोल विकास झालेला नाही, अशी जनमानसात भावना असून सर्व विभागांचा समतोल विकास घडवून आणावा** अशी मागणी विधानमंडळ व इतर माध्यमांमार्फत सातत्याने करण्यात येत आहे. याबाबत शासन जागरूक असून राज्यातील सर्व विभागांचा समतोल विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने वेळोवेळी उपाययोजनाही करण्यात आलेल्या आहेत... विकासातील विभागीय असमतोलाचा शास्त्रशुद्ध व सखोल अभ्यास करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याकरिता शासनाने तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्याचे ठरविले आहे." असा स्पष्ट उल्लेख महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने दिनांक ३ ऑगस्ट १९८३ रोजी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयाच्या (आरडीव्ही/१०८२/सीआर-३८/पीआरजी- १४) प्रास्ताविकामध्ये नमूद आहे. हा शासननिर्णय निर्गमित होण्याच्या चार पाच दिवस अगोदर **"विभागीय असमतोलाबाबतचा अभ्यास करण्याकरिता एक सत्यशोधन समिती स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे"** अशा प्रकारची स्पष्ट घोषणा महाराष्ट्र राज्य विधान सभेमध्ये दिनांक २९ जुलै १९८३ रोजी नियम ४६ अन्वये एक निवेदन करून त्यावेळच्या अर्थ व नियोजन मंत्र्यांनी केली होती. वर नमूद केलेल्या शासन निर्णयाने सत्यशोधन (दांडेकर) समितीची स्थापना झाली व या समितीने एप्रिल १९८४ मध्ये आपला अहवाल शासनाला सादर केला.

## मतदान कसे करावे ?

१. निवडणूक अधिकाऱ्याने पुरविलेल्या जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरा. मतपत्रिकेसोबत हे स्केच पेन तुम्हाला देण्यात येईल.

२. मतदान करतांना उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर "पसंतीक्रम" म्हणून असलेल्या स्तंभामध्ये १ असा अंक लिहून मतदान करावयाचे असते. उदा. प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नावापुढे पसंतीचा १ हा अंक लिहावा.

३. अन्य पद्धतीने मतदान केल्यास उदा. खुण करून किंवा अक्षरात एक, प्रथम, फर्स्ट अशी अक्षरे लिहिल्यास मतपत्रिका रद्द होते.

४. पसंतीचा १ हा क्रमांक एकाच उमेदवाराच्या नावापुढे लिहावा. दोघांच्या नावापुढे लिहील्यास मतपत्रिका रद्द होते.

५. प्रा.बी.टी.देशमुख यांच्या नावासमोर पुढील प्रमाणे पसंतीचा १ हा क्रमांक लिहावा. तो इंग्रजी किंवा मराठी अंकात टाकलेला चालतो. अक्षरात मात्र टाकू नये.

| | |
|---|---|
| प्रा.बी.टी.देशमुख | १ |

### *विधानमंडळाच्या उभय सभागृहांचा ठराव*

५. सत्यशोधन समितीचा **अहवाल सादर झाल्यानंतरच्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या जुलै १९८४ च्या अधिवेशनात गुरुवार, दिनांक २६ जुलै १९८४ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी वैधानिक विकास मंडळाबाबतचा पुढील ठराव उभय सभागृहात मांडला व तो सम्मत झाला** :-

"भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ खंड (२) या अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्र राज्याच्या संबंधात आदेश काढून त्याव्दारे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगवेगळी विकास मंडळे स्थापन करावीत अशी विनंती महाराष्ट्र शासनाने राष्ट्रपतींना करावी."

### *राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविणारे मा. राष्ट्रपतींचे आदेश*

६. महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी जरी उक्त ठराव एकमताने दिनांक २६ जुलै १९८४ रोजी मंजूर केलेला असला तरी वैधानिक विकास मंडळांची प्रत्यक्ष स्थापना ही दिनांक १ मे १९९४ रोजी म्हणजे जवळ जवळ १० वर्षांनी झाली. घटनेच्या कलम ३७१ (२) अन्वये भारताच्या मा. राष्ट्रपतींना असलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी **दिनांक ९ मार्च १९९४ रोजी "महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश १९९४"** पारीत करून महाराष्ट्राच्या राज्यपालांना शक्ती प्रदान केली. या आदेशाच्या परिच्छेद दोन मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, :-

"**2. Special responsibility of governor :** The Governor of Maharashtra shall have special responsibility for the establishment of separate Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra and for matters specified in sub-clauses (b) and (c) of clause (2) of Article 371 of the constitution in respect of the area of each such Development Board."

### *राज्यपालांच्या अधिकाराबाबत ॲडव्होकेट जनरलचे मत*

७. वर्षानुवर्षे लोकनियुक्त मंत्रिमंडळांना प्रादेशिक असमतोल दूर करण्यात अपयश आल्यामुळे कलम ३७१(२) ची उपाययोजना करण्यात आली हे अधिकार मा. राज्यपालांनी स्वतः स्वविवेकानुसार वापरावयाचे आहेत. राज्यपालांनी वापरावयाच्या या अधिकाराचे स्वरुप समजून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या ॲडव्होकेट जनरलनी याबाबत १७.१२.२००३ रोजी "Directives issued by the Hon'ble Governor on 15 December 2001 and 12 March 2003 pursuant to Article 371 (2) of the Constitution of India." या विषयावर स्पष्टपणे लेखी मत दिले आहे. त्यांचे मत सभागृहासमोर ठेवण्यात आले असून त्यातील महत्वाचे मुद्दे पुढील प्रमाणे :-

*C P A*

# *Commonwealth Parliamentary Association*

## राष्ट्रकुल संसदीय मंडळ : महाराष्ट्र शाखा

## "जीवन गौरव पुरस्कार"

## सन्मानपत्र

**मा. श्री. बी.टी.देशमुख**

आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा उचित गौरव करून सन्मानित करण्याचा हा सुवर्णकांचन योग! समाजातील सर्व स्तरांवरील जनतेचे व विशेषतः सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व करीत असतांना आपण कृती व उक्ती मध्ये कधी अंतर पडू दिलं नाही. आपल्या जगण्याला मानवतेचे अधिष्ठान आहे. तत्त्वनिष्ठा, मुल्यनिष्ठा व समाजाप्रती असलेली कर्तव्यपरायणता यांच एक आदर्श चित्र आपण आपल्या व्यक्तिमत्वातून समाजापुढे उभं केल आहे. समाजाच्या व्यथा, वंचितांच्या वेदना यांच संसदीय व्यासपीठावर विश्लेषण करतांना संबंधित विषय अधिक प्रखरपणे व तत्त्वनिष्ठ भावनेने मांडण्याची तद्धतच राजकीय व सामाजिक जीवनात तत्त्वांशी कुठेही तडजोड न करता सामाजिक प्रश्नांची सामाजिक बांधिलकीच्या भावनेने सोडवणूक करण्याची आपली शैली म्हणजे आपली उपजत बुद्धिमत्ता, व्यासंगी वृत्ती व लोकसाधनेचे द्योतक आहे. समाजाच्या प्रश्नांची अधिक तीव्रतेने जाण असणारा व त्यांचे भान ठेवून संसदीय लोकशाही प्रणाली अधिक निकोप व समृद्ध करण्यास मोलाचे योगदान देणारा एक प्रतिभासंपन्न नेता, संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा यांचे काटेकोर पालन करून समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, श्रीमंत गरिबीची कुंपणे तोडून समाजाच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या व आपल्या कुशल नेतृत्त्वाने सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या एका 'राजयोग्याचा' व देवघरात मंदपणे तेवणाऱ्या नंदादिपाप्रमाणे लोकसेवेची ज्योत प्रज्वलित ठेवलेल्या आपल्यातील 'व्यक्तिमत्वाचा' हा सन्मान !

आपल्यातील कुशल नेतृत्त्वाने संसदीय लोकशाहीला अधिक सुदृढ करण्यासाठी आपण दिलेले योगदान, समाजातील सर्व स्तरांस आपण दिलेला विश्वास व समाजाप्रती असलेली जाज्वल्य निष्ठा व जिव्हाळा या वैशिष्ट्यांमुळे हा "जीवन गौरव" पुरस्कार अत्यंत भारावलेल्या अंतःकरणाने आपणास प्रदान करतांना राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेला अतिशय आनंद होत आहे.

**(बाबासाहेब कुपेकर)**
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व
सह अध्यक्ष, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा

*

**(शिवाजीराव देशमुख)**
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व
सह अध्यक्ष, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा

महामहिम राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते सोमवार, दिनांक २९ जून २००९ रोजी सकाळी ११ वाजता मुंबई येथे विधान भवनाच्या प्रांगणात जीवन गौरव पुरस्कार प्रा.बी.टी.देशमुख यांना प्रदान करण्यात आला

"**III. OPINION**

**III.1.** In my opinion

**(1) there is no doubt that the directives given by the Hon'ble Governor are mandatory.** *(Para III.1 of the opinion)*

(2) Article 371 begins with a *non obstante* clause. The words, "notwithstanding anything contained in the Constitution" are significant. **It marks a departure from the scheme of the Constitution** which makes all financial matters the province of the Legislature. *(Para III.1.A of the opinion)*

(3) The main order dated 9 March 1994, under Article 371(2) was issued by the President of India. The governor has to act under the presidential order. The development Boards for Vidarbha, Marathawada and the rest of Maharashtra order, 1994 brings into force the Development Boards and all matters within the meaning of this order are to be **within the exclusive discretion of the Governor** who does not act on the aid or advice of the Council of Ministers. It is therefore clear that this is a constitutional obligation vested in the Governor by the President of India as a matter of constitutional provisions and policy. *(Para III.1.B of the opinion)*

(4) The aforesaid Constitutional provisions and the scheme of the various orders which have been passed mark a **deliberate departure from the ordinary rules of Legislative business** based on broad policy considerations incorporated in Article 371 (2) and this must prevail. *(Para III.1.D of the opinion)*"

### *मा. उच्च न्यायालयाचा निर्णय*

८. स्वतः प्रा.बी.टी.देशमुख हे प्रथम याचिकाकर्ते असलेल्या सन २००३ च्या WP.No. 5872 या याचिकेमध्ये (इतर अनेक याचिकांच्या सोबत) मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २००८ रोजी दिलेल्या निर्णयात असा स्पष्ट निर्णय दिलेला आहे की :-

"Under Article 371, there is a special responsibility imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidharbha and Marathwada regions and the same was a constitutional obligation imposed on the Governor, which cannot be frustrated." (- See Para 27 of the Judgment) पुढे याच निर्णयात न्यायालयाने असाही निर्णय दिलेला आहे की,

"Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like Marathwada and Vidharbha. The directives of the Governor are binding on the State." (- See Para 28 of the Judgment)

### *महाराष्ट्र राज्य स्थापनेचा सुवर्ण महोत्सव व सत्यशोधनाचा रौप्यमहोत्सव*

९. महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सूवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले जात असून प्रादेशिक असमतोलाने विद्रुप झालेल्या महाराष्ट्राच्या चेहऱ्याचे दर्शन घडविणाऱ्या सत्यशोधन समितीचा अहवाल सादर झाल्याच्या घटनेचेसुद्धा हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. या अहवालाच्या रौप्य महोत्सवी वर्षात जलसिंचनाचा अनुशेष एका हेक्टरने कमी तर झालाच नाही पण तो दुप्पटीने वाढल्यामुळे ही विद्रुपतासुद्धा आणखीच वाढलेली आहे. विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अधिकृत अहवालाप्रमाणे सन २००१ ते २०१० या कालखंडात पॅकेजखाली असलेल्या सहा जिल्ह्यात ६०६४ शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्याचे नमुद आहे. अमरावती विभागातील पाचही जिल्हे या सहामध्ये समाविष्ट आहेत. **प्रादेशिक असमतोलाच्या या विषारी वृक्षाला शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांची आलेली ही कटू फळे आहे. १९९४ पासून ज्यांच्यावर विशेष जबाबदारी सोपविली त्या मा.**

**मुद्रा**

**राष्ट्रकुल संसदीय मंडळ**

# राष्ट्रकुल संसदीय मंडळ,

## महाराष्ट्र शाखा

### 'उत्कृष्ट संसदपटु'

### पुरस्कार सन - १९९५-९६

# सन्मानपत्र

श्री. भाऊराव तुळशीरामजी देशमुख, विधानपरिषद सदस्य हे गेली १५ वर्षाहून अधिक काळ संसदीय प्रणालीचा पाया मजबूत करण्यामध्ये एक अग्रेसर म्हणून ओळखले जातात. सन १९८० मध्ये त्यांनी जेव्हा विधानमंडळामध्ये प्रवेश केला तेव्हापासून त्यांनी आपली संसदीय प्रणाली अधिक भक्कम होण्यासाठी भरीव योगदान दिले आहे. सामाजिक जाणिवेची निसर्गदत्त देणगी आणि उत्कृष्ट धैर्य त्यांना लाभल्याने त्यांनी नेहमीच राज्यातील जनतेच्या भल्यासाठी निक्षून आणि अत्यंत निर्धाराने आपली बाजू मांडली. त्यांनी अभ्यास व तपश्चर्येव्दारा वाटचाल केली आणि अशा तऱ्हेने त्यांनी लोकांच्या समस्यांचा आवाका आणि व्याप्ती पूर्णपणे समजून घेतली. त्यांची उपजत बुद्धिमत्ता आणि कार्यकुशलता यामुळे त्यांचे विशेष व्यक्तिमत्व बनले आहे. विविध विषयांचे अर्थपूर्ण व सुलभ विशदीकरण करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे महाराष्ट्र विधानमंडळाच्या माध्यमातून संसदीय प्रणाली सजीव आणि समृद्ध होण्यास मदत झाली आहे. विधिमंडळाचे नियम आणि कार्यपद्धती यावर असलेली त्यांची उत्तम पकड आणि संसदीय सभ्याचार व प्रतिष्ठा तसेच समित्यांच्या कामांची उत्तम जाण याकरिता ' **उत्कृष्ट संसदपटु** ' हा पुरस्कार त्यांना देण्यात राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेला अतिशय आनंद होत आहे.

**दत्ताजी नलावडे**
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व सह अध्यक्ष,
राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा

**जयंतराव टिळक**
सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व सह अध्यक्ष,
राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा

**राज्यपालांनी अनुशेष निर्मूलनाच्या विशेष जबाबदारीकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असेच म्हणावे लागेल.**

### *भारतीय संविधानाच्या इतिहासात ही गोष्ट प्रथमच घडलेली होती*

**१०.** "आतापर्यंत अशा प्रकारची शिफारस करण्याचा अधिकार विधानपरिषदेला आहे हेच अनेकांना माहित नव्हते........ सुप्रसिद्ध वर्तमानपत्रांनी अग्रलेख लिहून आणि काहींची पत्रके प्रसिद्धी करुन हा अधिकारच विधानपरिषदेला नाही, असे सांगितले आणि टीकासुद्धा झाली. पण प्रत्यक्ष जेंव्हा सर्व पाहिले तेव्हा समजले की, हा अधिकार विधानपरिषदेला आहे. एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे लागले. त्या अधिवेशनामध्ये विधानपरिषदेने केलेली शिफारस विधानसभेने जशीच्या तशी, एकही शब्दाचा फरक न करता कोणताही विरोध न करता मान्य केली." असे उद्‌गार खुद्द तत्कालीन मा. सभापती श्री.ना.स.फरांदे यांनी आपल्या भाषणात काढले होते. *( - राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन, मुंबई ४०० ०३२ यांच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या "राज्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित करण्यात आलेला ३४ वा संसदीय अभ्यासवर्ग, सन २००३" या पुस्तकाचे पृष्ठ २४ व २५ पहा )* गुरुवार, दिनांक १० एप्रिल २००३ रोजी विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपली शिफारस सभागृहात मांडण्यात यश मिळविले. भारतीय संविधानाच्या कलम २०४ अन्वये "विनियोजन विधेयकाला सुधारणा सुचविण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला नाही पण कलम १९८ अन्वये अशा विधेयकाबाबत शिफारस करण्याचा अधिकार आमच्या सभागृहाला निश्चितच आहे". विधानपरिषदेत अशा शिफारसीचा मसुदा मांडल्या गेला, तो सभागृहात एकमताने स्वीकारला गेला, त्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे खास अधिवेशन बोलवावे लागले, विधानसभेने ती शिफारस एकमताने मान्य केली, भारतीय संविधानाच्या इतिहासात ही गोष्ट प्रथम घडलेली होती व या घटनाक्रमाचे नेतृत्त्व करण्याचे भाग्य मला लाभले होते याबद्दल मला सार्थ अभिमान वाटतो.

### *निवडणूक जाहिरनामा*

**११.** केंद्रात म्हणा किंवा राज्यात म्हणा राज्यकारभाराचे खरे अधिकार घटनेने मंत्रिमंडळाला दिलेले असतात. मंत्रिमंडळाचे अस्तित्व हे केंद्रात लोकसभेतील व राज्यात विधानसभेतील बहुमतावर आधारित असते, त्यामुळेच निवडणूका होत असतांना शासनाने "**जे करायला पाहिजे होते ते केले नाही व जे करायला नको होते ते केले**" अशा सुत्रांवर उमेदवारांच्या जाहिर भूमिका बांधलेल्या असतात व अशा सुत्रांचा विस्तार पूर्वक मुद्देनिहाय विचार मांडलेल्या संघटीत दस्तऐवजाला (Origanized document) निवडणूक जाहिरनामा म्हटले जाते. आपल्या विचारांना व भूमिकांना लोकांची मान्यता मिळविणे हा प्रमुख उद्देश असा जाहिरनामा प्रकाशित करण्यामागे असतो निवडणूकीमध्ये होणारे मतदान हे अशी मान्यता मिळविण्याचे अधिकृत माध्यम असते.

### *भारतीय कायदेमंडळाच्या निवडणूकीच्या इतिहासातील असा हा पहिलाच निवडणूक जाहिरनामा*

**१२.** भारताच्या घटनेत असलेली खंड ३७१(२) मधील तरतुद फक्त महाराष्ट्र व गुजराथ या दोन राज्यांनाच लागू आहे. त्या अधिकारांचा वापर करुन मा. राष्ट्रपतींनी राज्यपालावर विशेष जबाबदारी सोपविणारे आदेश फक्त महाराष्ट्रापुरतेच काढले आहेत. भारतातील दुसऱ्या कोणत्याही राज्यात अशी व्यवस्था अस्तित्वात नाही. संबंध भारतामध्ये फक्त एका महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीनही विभागांचा समतोल विकास व्हावा, वाढलेला प्रादेशिक असमतोल कमी व्हावा, तो यापुढे आणखी वाढू नये याची विशेष जबाबदारी घटनेने सोपविली आहे. **याबाबतचे खरेखुरे अधिकार महाराष्ट्राच्या राज्यपालांनी वापरावयाचे आहे व त्यामुळेच हे घटनात्मक कर्तव्य पार पाडत असतांना राज्यपालांनी जे करायला पाहिजे ते केले नाही व करायला नको ते केले या सुत्राभोवती मांडलेला विचार मी पुढे नमूद करीत आहे. भारतीय संविधान अस्तित्वात आल्यापासूनच्या इतिहासात राज्यपालांच्या कृतिअकृतिचा आढावा घेवून बांधलेला हा पहिलाच निवडणूक जाहिरनामा असेल.**

### *जलसिंचन अनुशेष*

**१३.१.** जलसिंचन या विकास क्षेत्रात जो जिल्हा राज्य सरासरीच्या खाली असेल तो अनुशेष जिल्हा. तो जितक्या हेक्टरने खाली असेल तेवढ्या हेक्टरचा भौतिक अनुशेष त्या जिल्ह्याचा ठरेल. तो दुर करण्यासाठी लागणारी रुपयातील किम्मत म्हणजे त्या जिल्ह्याचा आर्थिक अनुशेष होय. जलसिंचन अनुशेषाची ही व्याख्या प्रथम सत्यशोधन सिमितीने निश्चित केली व तीच व्याख्या कायद्यामध्ये पुढे समाविष्ट करण्यात आली. **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम**

# सिटीझन्स फोरम ( नागरिक मंच ) महाराष्ट्र
# दक्ष नागरिक पुरस्कार - २००७
## *सन्मानपत्र*

आदरणीय प्रा.बी.टी.देशमुख सर,

संसदीय लोकशाहीच्या आपणासारख्या एका महान दीपस्तंभाला हे मानपत्र सादर करतांना आम्ही स्वतःच गौरवान्वित झालो आहोत. मनाची संवेदनशीलता कायम असेल तर राजकारण व समाजकारणाचे सैद्धांतिक अधिष्ठान अबाधित राखता येते, याचा प्रत्यक्ष पुरावा आपण आपल्या कार्याच्या रुपाने समाजासमोर ठेवला आहे.

महोदय, आपल्या संसदीय कारकिर्दीची सुरूवात जरी प्राध्यापकांच्या अभेद्य संघटनेच्या उभारणीपासून झाली, तरी आपले कर्तृत्व या एकाच कार्यक्षेत्रापुरते मर्यादित राहिले नाही. विदर्भ विकासाचा अनुशेष, शेतकऱ्यांच्या समस्या, पाणी टंचाई, अशा विविध प्रश्नांना न्याय देण्यासाठी आपल्या अद्वितीय कौशल्याचा आपण ज्या लढावू बाण्याने उपयोग केला, त्यामुळे संसदीय आयुधे कशी वापरावीत याचा एक आदर्श आपण नवोदित लोकप्रतिनिधींसमोर ठेवला आहे. जागरूक लोकप्रतिनिधी कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून आपला उल्लेख करता येईल.

अप्रतिम संघटन कौशल्य, कमालीची सचोटी, स्वच्छ व पारदर्शक कार्यपद्धती, सामंजस्य व आक्रमकता यांचा सुरेख संगम, आणि जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी संसदीय आयुधांचा अचूक वापर, या आपल्या वैशिष्ट्यांमुळे महाराष्ट्र विधान परिषदेवर आपण गेल्या पंचवीस वर्षांपासून अधिराज्य गाजवीत आहात. अध्ययन, चिंतन, मनन, आणि हाती घेतलेल्या कामाचा चिकाटीने पाठपुरावा, या गुणांमुळे सत्ताधाऱ्यांना आपल्याविषयी सदैव आदरयुक्त धाक वाटत राहिला. आपल्या अजोड योगदानाची दखल घेवून राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेने 'उत्कृष्ट संसदपटु' म्हणून आपला गौरव केला.

आदरणीय सर, आपली तत्वनिष्ठा, साधी राहणी, निराभिमानी वृत्ती, यामुळे विदर्भाच्या लोकमानसात आपण विलक्षण जिव्हाळ्याचे व प्रेमाचे स्थान प्राप्त केले आहे. 'बी.टी.' या दोन अक्षरांमध्ये सामान्य माणसाच्या हृदयाचा ठाव घेणारी जादू आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढणाऱ्या सर्वच व्यक्तींचे व संस्थांचे आपण प्रेरणास्थान आहात. या लोकभावनेचे प्रतीक म्हणून आम्ही अर्पण केलेला हा लहानसा पुरस्कार स्वीकारून आपण आम्हाला उपकृत केले आहे. आपले जीवितकार्य पुढे नेण्यासाठी आणि नवीन पिढीला सातत्याने प्रेरणा देण्यासाठी आपल्याला उदंड आणि निरामय आयुष्य लाभो, हीच ईशचरणी प्रार्थना.

नागपूर
रविवार, दि. २४ जून २००७

कार्यकारिणी
सिटीझन्स फोरम ( नागरिक मंच ) महाराष्ट्र

# "पुढील वेळेस मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना आपण कोकणातून पाठवा." - श्री. जयंतराव टिळक

*विधान गंमतीचे वाटले तरी बी.टी.देशमुख यांच्या व्यक्तिमत्वाचा ठसा व सर्व क्षेत्रात अशा व्यक्तिमत्वाची गरज यातून स्पष्टपणे ध्वनित होते. १९९७ च्या पहिल्या अधिवेशनातील एक बोलका अर्थपूर्ण प्रसंग! राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेताना कोकण मधील विधान परिषद सदस्य श्री. वसंतराव बापट आपल्या भागाच्या उपेक्षेची सल व्यक्त करीत म्हणाले :-*

*"कोकणामध्ये येणाऱ्या नवीन कारखान्यांमध्ये काम करावयास फक्त कोकणी माणूस लागतो आणि साहेब मात्र बाहेरून आलेला असतो. कोकणामध्ये सुद्धा इंजिनिअरिंग आणि पॉलीटेक्निक कॉलेजचे वाटप नीटपणे झाले पाहिजे. याबाबत खरोखर लोकांनी चांगली भूमिका घेतली आहे. माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे विदर्भाच्या प्रत्येक प्रश्नावर पोटतिडिकीने भांडतात. नागपूरची संत्री मोठी झाली पाहिजेत यासाठी भांडतात. परंतु मला या गोष्टीचे वाईट वाटते की, आमच्या कोकणातील कुणीही आमदार या प्रश्नासाठी भांडत नाही, आग्रह धरीत नाही....." बापट यांचे हे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच मा. सभापती श्री.जयंतराव टिळक यांनी पुढील उद्गार काढले.* ***"पुढील वेळेस मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना आपण कोकणातून पाठवा."*** (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड ११०, क्रमांक ४, पृष्ठ क्रमांक ७२ दिनांक २० मार्च १९९७)

**२००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) या कायद्याच्या खंड २० मध्ये पुढील प्रमाणे महत्वपूर्ण तरतुद आहे :-** प्राधिकरणाच्या "अशा वार्षिक अहवालामध्ये जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये निश्चित झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये **प्रत्येक जिल्ह्याचा मोजण्यात आलेला अनुशेष,** जिल्हा पेरणीखालील क्षेत्र, प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये राज्यस्तरीय व स्थानिक प्रकल्पातून निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता, पेरणीखालील क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी, हेक्टरात अनुशेष, या सूत्राप्रमाणे व पद्धतीने अद्यावत माहिती उपलब्ध असलेला अलीकडील वर्षाच्या व त्यानंतर दरवर्षीच्या महाराष्ट्राच्या **राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्यावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक) दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल."**

**१३.२. जलसिंचन या विकास क्षेत्रात आर्थिक अनुशेष भरुन काढण्याचे धोरण टाकावू व कुचकामी ठरल्यामुळे ते त्याज्य ठरविण्याचे निदेश मा.राज्यपालांनी निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.** आर्थिक अनुशेष याचा अर्थ त्यावेळच्या राज्य सरासरीवर हेक्टरामध्ये निघालेल्या भौतिक अनुशेषाची अंदाजे काल्पनिक किम्मत धरुन काढलेला रुपयातील अनुशेष होय. आर्थिक अनुशेष भरून काढण्याची ही पद्धती संपूर्णपणे वांझोटी ठरलेली आहे. दांडेकर समितीच्या अहवालात **(यापुढे पहिला अहवाल १९८२ म्हणू )** ही किम्मत हेक्टरी १० हजार रुपये धरली होती, तर अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालात **(यापुढे दुसरा अहवाल १९९४ म्हणू )** ती ५० हजार रुपये प्रति हेक्टर व "महाराष्ट्र जलसम्पत्ती नियमन प्राधिकरण वार्षिक अहवाल २००७-०८" **(यापुढे तिसरा अहवाल २००७ म्हणू )** यामध्ये ती किम्मत ८० हजार रुपये प्रति हेक्टर धरलेली आहे. रुपयातील ह्या किम्मती त्यावेळच्या दरसूचीवर आधारलेल्या होत्या. प्रत्यक्षात वाढत्या किम्मतीमुळे ती रक्कम सतत वाढत जाते. **त्यामुळे आर्थिक अनुशेष भरून काढण्याचा हा मापदंड पूर्णपणे हास्यास्पद ठरला.** म्हणूनच मा. राज्यपालांनी निदेश देतांना या मापदंडाला त्याज्य ठरवावे.

**१३.३. एका हेक्टरचा सुद्धा भौतिक अनुशेष दूर झालेला नाही, त्याच्या निर्मूलनाला अजून सुरवातही झालेली नाही ती निदान आतातरी व्हावी :** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सर्वप्रथम विभागीय असमतोलाची निश्चिती पहिल्या अहवालाने केली. त्या अहवालाने निश्चित केलेला जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष, अनुशेष ग्रस्त भागामध्ये, एका हेक्टरने सुद्धा कमी झालेला नसून तो २००७ मध्ये हजारो हेक्टरने वाढलेला आहे.

**१३.४.** १९८२ च्या स्थितीची २००७ च्या स्थितीशी तुलना करता असे दिसून येते की, अमरावती जिल्ह्याचा भौतिक अनुशेष जो १३४ हजार हेक्टरचा होता तो २००७ मध्ये २३२.६९ हजार हेक्टरचा झालेला आहे. अकोला (वाशिमसह) जिल्ह्याचा अनुशेष ९२ हजार हेक्टरचा १९८२ मध्ये होता तो २००७ मध्ये (अकोला १३२.९८ अधिक वाशिम १२५.७२) एकूण २५८.७० हजार हेक्टरचा झालेला आहे. १९८२ मध्ये बुलढाणा जिल्ह्याचा अनुशेष ८४ हजार हेक्टरचा होता तो २००७ मध्ये २१४.६६ हजार हेक्टर झालेला आहे. १९८२ मध्ये यवतमाळ जिल्ह्याचा अनुशेष १०५ हजार हेक्टरचा होता तो २००७ मध्ये १८२.८७ हजार हेक्टर झालेला आहे. **महत्तम अनुशेषात असलेल्या अमरावती महसुली विभागाचा** जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष जून १९८२ मध्ये ४१७ हजार हेक्टरचा होता. तो आता जून २००७ मध्ये तो ८८८ हजार हेक्टरचा झाला आहे. म्हणजे दुप्पटीहून जास्त वाढला आहे.

**१३.५. विदर्भाचा** जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष जून १९८२ मध्ये ५२७ हजार हेक्टरचा होता तो आता जून २००७ मध्ये तो १०६५ हजार हेक्टरचा झाला आहे. **मराठवाड्याचा** जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष जून १९८२ मध्ये २६० हजार हेक्टरचा होता तो आता जून २००७ मध्ये तो ४९३ हजार हेक्टरचा झाला आहे.

**१३.६.** वाढणाऱ्या किम्मती व वाढणारी राज्यसरासरी यामुळे आर्थिक अनुशेष दुर करण्याचे धोरण कुचकामी व निरर्थक ठरले असून **भौतिक**

# *सावित्रीबाई फुले - फातिमा शेख : पुरस्कार २०१०*

**शिक्षक भारती**

***शिक्षणाच्या हक्कासाठी ! शिक्षकांच्या सन्मानासाठी !***

**प्रा.बी.टी.देशमुख**

तीन दशकाहून अधिक काळ विधान परिषदेत समतेचा आणि बुद्धीवादाचा झेंडा खांद्यावर कायम ठेवत संसदीय आघाडीवर आपण लढत आला आहात. विदर्भ आणि मागासलेल्या प्रदेशांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण एकाकी लढत दिलीत. शिक्षण क्षेत्रातलं आपलं काम दीपस्तंभासारखं आहे. महाराष्ट्रातील शिक्षक चळवळीचे आपण पितामह आहात. संसदीय आयुधांचा अचुक आणि प्रखर वापर करत आपण शिक्षण क्षेत्राला न्याय मिळवून दिला आहे. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांचे आपण पक्के पाईक आहात. शिक्षण क्षेत्रातील आपल्या असामान्य कामगिरीबद्दल शिक्षक भारती तर्फे हा सर्वोच्च पुरस्कार देऊन आम्ही आपणास सविनय गौरवित आहोत.

आमदार कपिल पाटील, अध्यक्ष — अशोक बेलसरे, कार्यवाह

.......................................................................................................................

रविवार, दिनांक १७ जानेवारी २०१० रोजी सकाळी ११ वाजता प्रा.बी.टी.देशमुख व ॲड. दत्ता पाटील यांना पनवेल येथील विठोबा खंडाप्पा हायस्कुलच्या सभागृहात केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाचे सदस्य श्री. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## वागत असताना, बोलत असताना, विचार करीत असताना परिपक्वतेचा ठसा त्यांनी निर्माण करून ठेवला आहे - श्री.नितीन गडकरी

*"या सभागृहामध्ये आल्यानंतर **त्यांनी संपूर्ण शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्याबद्दल अतिशय आदराची आणि सन्मानाची भावना निर्माण केलेली आहे. वागत असताना, बोलत असताना, विचार करीत असताना परिपक्वतेचा ठसा त्यांनी निर्माण करून ठेवला आहे.** विदर्भातील बॅकलॉगचा प्रश्न असो अथवा इतर ठिकाणी काही अन्यायाचा प्रश्न असो, त्यावेळी तरूणांना लाजवेल अशा पध्दतीने ते तुटून पडत होते. अशा प्रकारे अन्यायाच्या संबंधी ते तुटून पडत असले तरी सुध्दा त्यांच्या वैयक्तिक जीवनामध्ये येणारा अनुभव मात्र वेगळा आहे. सन्माननीय सदस्य **श्री.बी.टी.देशमुख हे अत्यंत योग्य, कर्तृत्ववान आणि सभागृहाची प्रतिष्ठा बाळगणारे असे सन्माननीय सदस्य आहेत.** या सभागृहाचा इतिहास ज्यावेळी लिहिला जाईल त्यावेळी ज्या सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख त्यामध्ये केला जाईल त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचे नाव राहणार आहे."* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १०९, क्रमांक ८, पृष्ठ क्रमांक ४२ बुधवार, दिनांक १८ डिसेंबर १९९६) *श्री. नितिन गडकरी, तत्कालीन सार्वजनिक बांधकामे मंत्री.*

**अनुशेष निर्मूलनाचे धोरण स्विकारणे आवश्यक झाले आहे तसे निदेश मा. राज्यपालांनी तत्परतेने दिले पाहिजेत.**

**१३.७. दरवर्षीच्या राज्यसरासरीवर भौतिक अनुशेष अद्यावत करण्याचे धोरण स्विकारण्याची आवश्यकता :-** अनुशेष निर्मूलनाच्या एकंदर धोरणामध्ये, एक म्हणजे आर्थिक अनुशेष (रुपयातील) दुर करण्याचे धोरण स्विकारणे व दुसरे म्हणजे एका विशिष्ट वर्षाच्या सरासरीवर काढलेला अनुशेष, (पुढच्या पुढच्या प्रत्येक वर्षी अद्यावत न करता) दूर करण्याचे धोरण स्विकारणे हे दोन मोठे दोष आजपावेतोच्या राज्यपालांच्या निदेशात होते असे दिसून येते. जून १९८२ च्या राज्य सरासरीवरील पहिला अहवाल हाती आल्यानंतर जलसिंचन या विकास क्षेत्रात जो अनुशेष निर्धारित झाला तो दरवर्षीच्या राज्य सरासरीवर वाढला किती? किंवा कमी किती झाला? हे न पहाता २००० पर्यंत म्हणजे १८ वर्षे आम्ही जून १९८२ च्या राज्यसरासरीवर काढलेला अनुशेष भरत राहिलो. जून १९९४ च्या राज्यसरासरीवर दुसऱ्या अहवालातून जी माहिती आपल्या हाती आली, त्यातून असे लक्षात आले की, जून १९८२ चा विदर्भ व मराठवाड्याचा भौतिक अनुशेष कमी झालेला नसून वाढलेला आहे. तिसऱ्या अहवालाचे अवलोकन केले तर आमच्या असे लक्षात आले की, एका हेक्टरने सुद्धा १९९४ **चा तर सोडाच पण १९८२ चा अनुशेष कमी झालेला नाही, तो दुर होणे किंवा संपुष्टात येणे हे तर दुरच राहीले.**

**१३.८.** वेगळी कोणतीही यंत्रणा स्थापन न करता **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण** अधिनियमाच्या कलम २० अन्वये प्राधिकरणासारख्या या विधिमय यंत्रणेकडे दरवर्षीच्या जूनच्या सरासरीवरील अनुशेष दाखविण्याचे हे जे काम आता कायद्याने सोपविलेले आहे त्याचा उपयोग दरवर्षीच्या राज्य सरासरीवरील अनुशेष अद्यावत करण्यासाठी होवू शकतो. प्रत्येक वर्षी करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतून प्रत्येक जिल्ह्याचा भौतिक अनुशेष किती हेक्टरने कमी झाला व त्यावर्षात राज्य सरासरी वाढल्यामुळे तो किती हेक्टरने वाढला म्हणजे एकूण किती कमी झाला किंवा जास्त झाला याचे दरवर्षीचे चित्र प्राधिकरणाच्या यंत्रणेच्या माध्यमातून अद्यावत करता येईल. अशा रीतीने **दरवर्षीच्या भौतिक प्रगतीच्या व वाढलेल्या राज्य सरासरीच्या आधारावर दरवर्षीचे प्रत्येक जिल्ह्याचे जलसिंचन अनुशेषाचे चित्र अद्यावत करणे हा मा.राज्यपालांच्या निदेशांचा अपरिहार्य भाग असावा असे आम्हाला वाटते. कायद्याने स्थापित यंत्रणा उपलब्ध असतांना वेगळी समिती नेमण्याचा विचार मा. राज्यपालांनी त्याज्य व टाकावू समजला पाहिजे.**

**१३.९. जलसिंचन अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचन प्रयोजनासाठी कोणत्याही परिस्थितीत वळविता कामा नये :-** महाराष्ट्रात जलसिंचन या विकास क्षेत्रात अनुशेषात असलेल्या जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचनीय प्रयोजनासाठी वळविल्यामुळे सिंचन अनुशेष आणखी वाढतो म्हणून तसे करता कामा नये याबाबतचे सक्त निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावेत.

**१३.१०.** सत्यशोधन समितीने अहवालाच्या परिच्छेद १७.२५ मध्ये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये चालू असलेली कामे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि स्वाभाविक वाढ विस्तारांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी राज्यपातळीवरील निधीमधून १५ टक्के रक्कम राखून ठेवावी, असे आम्ही सुचविलेले आहे.१५ टक्के रक्कम ही यासाठीची कमाल मर्यादा मानावी हे बजावून सांगितले पाहिजे. राज्यपातळीवरील निधीमधून यापेक्षा अधिक प्रमाणात रक्कम अनुशेषाशी असंबध्द कामासाठी वापरली तर आजचा अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल." १५/८५ ची ही एक शिफारस जरी अमलात आली असती तरी अनुशेषाचा

## *माननीय श्री.बी.टी. देशमुखसाहेब, आमच्यातील ज्येष्ठ, अभ्यासू, सिनिअर अपक्ष सदस्य आहेत. ते कोणत्याही पक्षाचे नाहीत, निस्पृह आहेत, त्यांची इन्टेग्रिटी कोणी चॅलेंज करु शकत नाही.*

### – श्री.नितीन गडकरी, मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद

"...... राज्यपालांनी दिलेल्या ज्या डायरेक्शन्स आहेत त्या तुम्ही बाजूला ठेवणार आहात. ही गंभीर परिस्थिती आहे. या अनुशेष निर्मूलन समितीमध्ये विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील सर्व सन्माननीय सदस्य आहेत. आम्ही याठिकाणी कुठेही विदर्भाचा विषय मांडू इच्छित नाही. अनुशेष निर्मूलन समितीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री बी.टी.देशमुखसाहेबांनी पुढाकार घेतला, ते अपक्ष सदस्य आहेत. मी प्रमुख झालो तर भाजपवाल्यांचे नाटक आहे, सन्माननीय सदस्य श्री. रणजीत देशमुख प्रमुख झाले तर ते काँग्रेसवाल्यांचे नाटक आहे आणि श्री. दत्ता मेघे प्रमुख झाले तर तर ते राष्ट्रवादीचे नाटक आहे असे होईल. **मग आम्ही निर्णय घेतला की, आमच्यातील ज्येष्ठ, अभ्यासू, सिनिअर, माननीय श्री.बी.टी.देशमुखसाहेब अपक्ष सदस्य आहेत. कमीतकमी ते कोणत्याही पक्षाचे नाहीत, निस्पृह आहेत, त्यांची इन्टेग्रिटी कोणी चॅलेंज करु शकत नाही.** मग आम्ही त्यांना विनंती केली की, बी.टी.साहेब तुम्ही आमचे प्रमुख व्हा. आम्हाला प्रोटोकॉलशी काही देणे-घेणे नाही. आम्ही तुमच्याबरोबर काम करु. आम्हाला क्रेडीट मिळाले नाही तरी चालेल. तुम्ही पुढे व्हा, **पण आमच्या या मागासलेल्या भागाला न्याय मिळाला पाहिजे. हा खरा प्रश्न आहे. तसेच या विषयावर सर्वपक्षीय आमदारांची एकजूट झाली पाहीजे याकरता आम्ही सर्वजण मागे व्हावयास तयार आहोत पण तुम्ही पुढे व्हा. अशा प्रकारची विनंती सर्वश्री. रणजित देशमुख, मी स्वतः, दत्ता मेघे इ. जणांनी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना केली आणि या फोरमतर्फे आम्ही सर्वांनी महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांना निवेदन दिले.** त्याच्या आधारावर महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्स दिल्या. त्या कोणत्या दिल्या तर ' निधीचे समन्यायी वाटप. 'Equal distribution of funds for irrigation' हे याचे हेडींग आहे." – **श्री.नितीन गडकरी, तत्कालिन मा. विरोधी पक्षनेते,**

*(तिसरे अधिवेशन २००२:सोमवार, दिनांक १६ डिसेंबर २००२:महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही,अधिकृत प्रतिवेदन,खंड १२९, क्रमांक ४, पृष्ठ १३३-१३५)*

***''विधानपरिषदेतील उदाहरण मी या प्रसंगी देऊ इच्छितो. मा. प्रा.बी.टी.देशमुखांसारखा आदर्श लोकप्रतिनिधी केवळ शैक्षणिक प्रश्नच मांडत नाहीत तर हाडाचे ते शेतकरी, काळ्या आईशी इमान राखणारे म्हणून शेतीचा प्रश्न, कापसाचा प्रश्न, संत्र्याचा प्रश्न त्याचबरोबर शिक्षणाचे प्रश्नही तितक्याच पोटतिडीकीने मांडतात. सांस्कृतिक आक्रमणाबद्दल, समाजातील अनिष्ट व वाईट प्रथांबद्दल तितकेच पोटतिडीकीने ते बोलतात. त्यांचा त्वेष सभागृहात मी पाहिलेला आहे''***

**- मा.श्री. उल्हास पवार, ज्येष्ठ काँग्रेस नेते**

*(राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन, मुंबई ४०० ०३२ यांच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या "राज्यातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत आयोजित करण्यात आलेला ३४ वा संसदीय अभ्यासवर्ग, सन २००३" या पुस्तकाचे पृष्ठ ५२ पहा)*

डोंगर एवढा वाढला नसता. **जलसिंचन या विकास क्षेत्रासाठी असणाऱ्या वार्षिक तरतुदीतून बिगर अनुशेष जिल्ह्यासाठी १५ टक्के रक्कम राखून ठेवावी व उरलेली ८५ टक्के अनुशेष जिल्ह्यांना अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणारे निदेश राज्यपालांनी तत्परतेने निर्गमित करावेत.**

**१३.११.** घटनाबाह्य वर्तनाच्या पोटी जलसिंचन अनुशेष संपुष्टात येणे तर दुरच राहीले पण तो सतत वाढत आहे, हे लक्षात घेता **जलसिंचन असुविधेप्रति सानुग्रह अनुदान देण्याचे निदेश निर्गमित करावे** जलसिंचनाच्या विकासक्षेत्रातील अद्यावत सरासरीवर १००० कोटी रुपयाच्या वर अनुशेष असलेल्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये कोरडवाहू शेतीला प्रति हेक्टरी १० हजार रुपये, व १००० कोटी रुपयापेक्षा कमी अनुशेष असलेल्या जिल्ह्यामध्ये ५ हजार रुपये प्रति हेक्टर हे सानुग्रह अनुदान देण्याचे निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावेत.

**१३.१२.** इतर अनेक विकास क्षेत्राबाबत मा. राज्यपालांनी अजूनही निदेश दिलेले नाहीत. जलसिंचन या एका विकास क्षेत्राबाबत मा. राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचे पालन केले जात नाही अशी तक्रार खुद्द मा. राज्यापालांनीच केलेली आहे. सन २००९ - १० साठी २७ मे २००९ रोजी मा. राज्यपालांनी जे निदेश दिले त्या निदेशातील पुढील अवतरणे पहा :-

"The Governor has noted that these trends of excess expenditures in rest of Maharashtra region has continued even in the Financial Year 2007-08 and Financial year 2008-09 with significant shortfalls in Vidarbha region during this period. Similar trends are also observed within the regions as well."

"There have been significant continued deviations from the Governor's directives over the years. The Governor has noted with serious concern that in spite of the well-settled principles of allocation of funds to the regions, the actual expenditure does not comply with these directives. The Governor has, therefore, directed that the planning Department should investigate into this to fix responsibility for the same."

" The Governor therefore, observed that similar to the requirements of Krishna valley projects, other river basins viz. Godavari and Tapi which are governed by inter-state Awards or bilateral Agreements also require due consideration. In case of Godavari river basin, the total water available for the state is yet to be fully planned especially in Vidarbha region."

**घटनेने ज्यांच्यावर जबाबदारी सोपविली त्या राज्यपालांनी हतबल होवून चालणार नाही. माझे निदेश का पाळले जात नाही याची नियोजन विभागाने चौकशी करावी असे नुसते म्हणून चालणार नाही. ज्यांच्यावर असमतोल दुर करण्याची विशेष जबाबदारी सोपविली आहे त्यांना घटनेने तसे अधिकार दिलेले आहे. त्या अधिकारांचा त्यांनी वापर करावा.**

**१३.१३.** सन २००७ मध्ये **विदर्भात** जलसिंचन या विकास क्षेत्रात १०६५ हजार हेक्टरचा व **मराठवाड्याचा** ४९३ हजार हेक्टरचा अमरावती जिल्ह्यामध्ये २३२.६९ हजार हेक्टरचा, अकोला (वाशिमसह) जिल्ह्यात (अकोला १३२.९८ अधिक वाशिम १२५.७२) एकूण २५८.७० हजार हेक्टरचा, बुलढाणा जिल्ह्याचा २१४.६६ हजार हेक्टरचा, यवतमाळ जिल्ह्यात १८२.८७ हजार हेक्टरचा, एकूण काय तर **महत्तम अनुशेषात असलेल्या अमरावती महसुली विभागात** ८८८ हजार हेक्टरचा भौतिक अनुशेष असल्याने तेवढ्या हेक्टरच्या प्रकल्पांचे सर्व्हेक्षण करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे व ती कामे प्रत्यक्ष सुरु करण्याचे निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावे.

**१३.१४.** दिनांक २२ मार्च २००६ रोजी हेल्पलाईनच्या शिष्टमंडळाने मा. पंतप्रधानांची दिल्ली येथे संसद भवनात भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली या शिष्टमंडळात श्रीमती निर्मलाताई देशपांडे, मा. श्री.रा.सु.गवई, मा. खा.दत्ता मेघे, खा.सौ.भावना गवळी, श्री.जोगेंद्र कवाडे, खा.अनंत गुढे, आ.प्रा.बी.टी.देशमुख, आ. खोटरे, आ.पाटणी, आ.बच्चु कडू, आ.तट्टे, खा.सुरेश वाघमारे, श्री. मधुकरराव किंमतकर व प्रभाकरराव वैद्य प्रधान सचिव श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांचा समावेश होता. देशाच्या मा. पंतप्रधानांच्या निदेशावरुन योजना आयोगाची एक समिती श्रीमती आदर्श मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली विदर्भात येवून गेली. या समितीच्या अहवालात पुढील महत्वपूर्ण निष्कर्ष

## चातुर्य शहाणे झाले आणि प्रमेय रूचीसी आले.
## - सभापती श्री. जयंतराव टिळक

*"श्री.बी.टी.देशमुख यांची तयारी नाही असा कोणताही दिवस नाही, कोणताही विषय नाही, किंबहुना जी. आर. कधी निघाला, त्यात काय आहे यांपासून सभागृहामध्ये कोणी काय सांगितले या प्रत्येक बाबींची नोंद बी.टी. यांच्या फाईलमध्ये असते. त्याचा परिणाम असा होत असतो की, जो कोणी उत्तर देणारा मंत्री असतो त्याची फार फजिती होते. कारण बी.टी. जवळ जे जे असते ते मंत्र्याकडेसुध्दा नसते. परंतु बी.टी. देशमुखांच्या या गुणांकडे पाहता या सदनाचे पूर्वीचे सदस्य श्री.एन.डी.पाटील यांचा उल्लेख करावासा वाटतो. त्यांच्याकडेही सर्व विषयाची तयारी जय्यत असायची. थोडक्यात या दोघांबद्दल सांगावयाचे तर ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे **"चातुर्य शहाणे झाले आणि प्रमेय रूचीसी आले."** म्हणजे त्यांनी चातुर्याने विषय मांडला त्या विषयाचे फळ त्यांना मिळत राहिले. मग तो अमरावतीचा रिंगरोडचा प्रश्न असो वा अमरावती विद्यापीठाचा असो, महाविद्यालयाच्या हॉलचा विषय असो किंवा वेतनश्रेणीचा विषय असो. प्रत्येक बाबतीत ते जे मांडत गेले त्या त्यावेळी मंत्री खिंडीत पकडले गेले. श्री.बी.टी.देशमुख सांगत तुम्ही यांना - यांना देता,मग आम्हाला का नाही या त्यांच्या प्रश्नाला मंत्र्यांना उत्तर देता येत नसे...... बी.टीं.चा आवाज कधी चढेल तर कधी उतरेल, प्रश्न सुटतो आहे किंवा नाही हे ते मंत्र्यांच्या डोळ्याकडे पाहून समजून घेत आणि त्याप्रमाणे चातुर्याने प्रश्न मांडीत असत."* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ३ डिसेंबर १९९२, खंड ९७, क्रमांक४, पृष्ठ ६७) *श्री.जयंतराव टिळक महाराष्ट्र विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती*

आढळून येतात.

"Information received from the Government of Maharashtra, Office of the Governor and the Statutory Development Board indicate and that the implementation of the directives issued by the Governor of Maharashtra has not been satisfactory."

" Other regions of the State which were behind Vidarbha at the time of independence in irrigation development have now marched ahead of it in post independence period."

"There is an obvious lack of commitment in implementing any schemes under irrigation in Vidarbha."

" The acute and continued neglect of the area is well evidenced even by the human Development Index (HDI) of the State which shows that out of the 35 districts, 4 out of the six highly distressed districts of Vidarbha are uniformly among the lowest in the State."

"The history of implementation of the allocations since year 2000, for which the first allocations were indicated, shows that the State has traditionally surrendered the provisions for Vidarbha, while, paradoxically, bulk of the State's power requirements are drawn from this region."

"The Team felt that there was inadequate explanation for this lackadaisical attitude in implementation of projects for Vidarbha and that there was ample reason to suspect collusion and connivance in not sanctioning the funds for the region and later to move for supplementary budgets, mostly for irrigation in Western Maharashtra."

"The crying need of the area is for water, while it is true that the area is awaiting a favorable allocation under the Governor's directives, the real ailment is also appropriate planning of projects which would benefit the most people......The list of projects to be taken up for Vidarbha should be reviewed urgently and a time bound programme for the implementation of the full backlog should be designed and put into implementation mode within the next six months, that is right after the monsoons. "


असमतोल दुर करण्याची घटनेने विशेष जबाबदारी ज्या राज्यपालांवर सोपविलेली आहे. **त्यांनी निदेश देतांना मा. पंतप्रधानांनी नेमलेल्या या समितीच्या शिफारशीकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे व दाखविण्यात आलेल्या चूका दुर करण्याचे निदेश द्यावेत.**

१३.१५. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या २००६-२००७ च्या अहवालात (CAG Report 2006-07) पुढील ताशेरे आहेत :-

"CAG Report 2006-07 brings out that "Western Maharashtra (WM) benefited as the Vidarbha's backolg piled up. The diversion of funds to the influential WM and northern parts of state, ducking governor's directives has led to irreversible regional imbalance. Vidarbha has been robbed of 70% of its funds" Provision for irrigation amde by the Governor was Rs. 3119.79 crores but government allotted only Rs. 1391.58 crores that resulted in a backlog of Rs. 2528 crores."

**प्रादेशिक असमतोल दूर करण्याची विशेष जबाबदारी ज्यांच्यावर सोपविली आहे त्या राज्यपालांनी निदेश देतांना निदान भारताच्या नियंत्रक व महालेखा परिक्षकांचे शेरे, ताशेरे तरी विचारात घ्यावे.**

# प्रा.बी.टी.देशमुख : अल्प परिचय



एका अत्यंत गरीब पण 'शुचीनाम' कुटुंबात बेलोरा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती येथे २१ ऑगस्ट १९३९ रोजी जन्म. अतिशय परिश्रमपूर्वक काम करून स्वतःच्या शिक्षणासाठी स्वतः पैसे कमावून माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व पदव्युत्तर शिक्षण संपादन केले. शालेय व महाविद्यालयीन काळात वादविवाद स्पर्धेतून प्रभावी वादविवादपटू व वक्ता म्हणून "महादेव गोविंद रानडे वक्तृत्व स्पर्धे" सारख्या प्रतिष्ठाप्राप्त स्पर्धेतून प्रथम पारितोषिक व त्याशिवाय डझनावारी बक्षिसे व पारितोषिकांचे मानकरी. मेधावी वक्ता व विद्यार्थी म्हणून नावलौकिक.

समाजकार्य करण्याची जिद्द असल्याने व अंगभूत नेतृत्वगुणांमुळे आर्थिक दुर्बलतेवर मात करून १९६०-६१ या शैक्षणिक वर्षात अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाच्या छात्रसंघाचे अध्यक्ष म्हणून निर्वाचित. महाविद्यालयासाठी तत्कालीन शासनाकडून राज्यशास्त्र, इतिहास, संस्कृत व इंग्रजी या विषयाचे पदव्युत्तर वर्ग आणि मुलींचे आणखी एक नवे भव्य वसतिगृह मिळविण्यात सिंहाचा वाटा. नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या कार्यकारिणीचे १९६०-६१ मध्ये सदस्य. त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे व विद्याव्यासंगाचे फळ म्हणजे १९६४ साली राज्यशास्त्र विषयाच्या एम.ए. परीक्षेत नागपूर विद्यापीठातून त्यांनी प्राप्त केलेले प्रथम क्रमांकाचे स्थान.

१९६४ पासून कर्मयोगी शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या श्री. शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून राज्यशास्त्राच्या अध्यापनास प्रारंभ. एक अत्यंत कुशल प्राध्यापक म्हणून लौकिक. "भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन" या अभ्यासपूर्ण ग्रंथाचे १९६५ मध्ये लेखन. त्यांनी राज्यशास्त्र विषयावर लिहिलेली अनेक पुस्तके विद्यार्थ्यांच्या अतिशय आवडीची ठरली आहेत.

**नागपूर विद्यापीठ** सिनेट सदस्य, १९६९ ते १९८६, नागपूर विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य, १९७६ ते १९८५, नागपूर विद्यापीठ ॲकॅडेमिक कौन्सिल सदस्य १९७९ ते १९८२, नागपूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे डीन (अधिष्ठाते) १९७९ ते १९८२., नागपूर विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य १९६७ ते १९७५. **अमरावती विद्यापीठाच्या** स्थापनेपासून १९८३ ते १९९२ पर्यंत कार्यकारी परिषदेचे व १९९५ पासून १९९९ पर्यंत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य म्हणून कार्य.

अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून १९९९ पर्यंत सिनेट सदस्य, सोशल सायन्स फॅकल्टीचे डीन (१९९२ ते १९९६) म्हणून कार्य. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकच्या पहिल्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य (१९८९ ते १९९२). **डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या** कार्यकारी मंडळाचे सदस्य (१९८४ ते १९८६) व त्यानंतर पुन्हा १९९४ ते १९९८ व १९९९ पासून आजतागायत सदस्य.

संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना "नियमित वेतनाची व्यवस्था" लागु करण्यासाठी १९७७ मध्ये शासनाने नेमलेल्या समितीचे सदस्य. अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण व समायोजन करण्यासाठी नागपूर विद्यापीठाने नेमलेल्या "ॲडव्हाक कमेटीचे" (१९७६) सदस्य म्हणून महत्वपूर्ण कार्य. अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी योजना तयार करणाऱ्या राज्यस्तरीय पाच सदस्यीय समितीचे सदस्य म्हणून अतिरिक्त शिक्षकांच्या दृष्टीने फार महत्वपूर्ण भूमिका.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (NUTA) या प्राध्यापक संघटनेचे १९७३-७४ पासून आजतागायत अध्यक्ष. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO)

### *मा. उच्च न्यायालयासमोर याचिका*

**१३.१६.** हेल्पलाईनचे अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख व सरकार्यवाह प्राचार्य श्री. प्रभाकरराव वैद्य यांनी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सन २०१० ची याचिका क्र. १०३८ ही दाखल केली असून त्यामध्ये "दिनांक २१ फेब्रुवारी २००८ रोजी उच्चाधिकार समितीने सिंचनाचे पाणी कोळशावर आधारित वीज निर्मिती प्रकल्पाकडे वळविण्याचा जो निर्णय घेतला तो रद्द करण्यात यावा" अशी मा. उच्च न्यायालयाला विनंती केली आहे. महाराष्ट्रातील जलसाठे मर्यादित आहेत. सर्व महत्वाच्या नद्यांवर मुख्यतः सिंचनाच्या व पेयजलाच्या सोयीसाठी धरणे बांधण्यात आली आहेत. २००५ साली महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम विधीमंडळाने पारीत केला आहे. आणि त्या कायद्यातील तरतुदीनूसार पाण्याची हक्कदारी देण्याचे अधिकार हे त्या त्या विभागातील पाटबंधारे विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले परंतू त्यानंतर देखील "उच्चाधिकार समिती"नेच हे अधिकार वापरणे सुरु ठेवले. सिंचनाचा सर्वात जास्त अनुशेष असलेल्या जिल्ह्यातसुद्धा कोळशावर आधारित वीजनिर्मिती प्रकल्पांना हे पाणी वाटप करण्यात आले. न्यायालयात आम्ही दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी सुरु असतांनाच व विधीमंडळाचे अधिवेशन सुरु नसतांना मा. राज्यपालांनी एक अध्यादेश (सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११) जारी करून २००५ च्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ या मुळ अधिनियमात पुढील प्रमुख दुरुस्त्या केल्या :-

(१) "उच्चाधिकार समिती"ची व्याख्या करुन ती मुळ २००५ च्या कायद्यात टाकण्यात आली.

(२) आज केलेले हे सर्व बदल ८ जून २००५ पासून अमलात आले असे समजले जाईल. अशी तरतुद करण्यात आली.

(३) उच्चाधिकार समितीने यापूर्वी केलेले वाटप हे वैध असेल व ते नेहमीकरता वैध मानले जाईल. अशी तरतुद टाकली.

(४) "उच्चाधिकार समितीने दिलेली परवानगी वैध असेल कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर, पाणी काढण्यासाठी अशी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा हक्कदारी यांना आक्षेप घेणारा कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही" अशी तरतुद करण्यात आली.

(५) ज्या मा. राज्यपालांनी अमरावती जिल्ह्याचा सिंचन अनुशेष दुर करण्यासाठी वारंवार राज्यशासनाला निदेश जारी केले होते त्याच मा.राज्यपालांनी त्या महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यात सिंचनाचे पाणी उद्योगांकडे वळविले. तथापि, याबाबत मा. उच्च न्यायालयात रिट याचिका प्रलंबीत असल्यामुळे याबाबत अधिक भाष्य करणे उचित ठरणार नाही.

### *राज्यशासनाच्या नोकऱ्यांमध्ये समन्यायी प्रतिनिधित्व*

**१४.१.** राज्य शासनाच्या सर्व स्तरावरच्या नोकऱ्यांमध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तिनही विभागांना समन्यायी प्रतिनिधीत्व देण्याची तरतुद घटनेच्या कलम ३७१ (२) मध्ये आहे. या तिनही विभागामध्ये "राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करणारी समन्यायी व्यवस्था" स्थापन करण्याची विशेष जबाबदारी मा. राष्ट्रपतींनी राज्यपालांवर १९९४ च्या आदेशान्वये सोपविली पण त्याबाबत झालेली प्रगती निरंक म्हटली तरी चालेल.

**१४.२.** महाराष्ट्र शासन राज्यपत्रामध्ये ५ ऑगस्ट १९९४ रोजी मा. राज्यपालांनी याबाबत नियम करणारा एक आदेश प्रख्यापित केला. त्यातील नियम ८ (३) मध्ये "संबंधित मंडळाखाली येणाऱ्या क्षेत्रामधील राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये असलेल्या, नोकरीच्या उपलब्ध संधीच्या संबंधात **सामान्य प्रशासन विभाग एक आकडेवारीविषयक माहिती तयार करील.** पुर्वनिर्धारित दिनांकाच्या आधारे एकदा तयार केलेल्या अशा माहितीमध्ये दरवर्षी सुधारणा करण्यात येईल. त्या वर्षात निर्माण करण्यात आलेल्या नवीन पदांमुळे सेवाप्रवेशाकरिता उपलब्ध असणारी पदे किंवा निवृत्ती इत्यादीमुळे दर वर्षात रिकामी होणारी पदे यांचा या माहितीमध्ये समावेश असेल." अशी या नियमात तरतुद आहे. **सामान्य प्रशासन विभागाने राज्यपालांच्या या आदेशाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. विदर्भ वैधानिक विकास मंडळाने वारंवार आठवण करुन देऊनसुद्धा या नियमाचे पालन करण्यात आले नाही.**

**१४.३.** राज्यपालांच्या आदेशाकडे तुच्छतेने पहाण्याची प्रशासनाची ही वृत्ती या वर्तनातून ठळकपणे दिसून येते. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध

---

एक संस्थापक सदस्य, प्रारंभापासून आजतागायत महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, १९९० ते १९९२ व पुन्हा १९९२ ते १९९४ पर्यंत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्य. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाच्या (AIFUCTO) राष्ट्रीय कार्यकारी मंडळाचे १९९४ पासून आजपावेतो सदस्य.

डिसेंबर १९८० मध्ये विदर्भ पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर सदस्य म्हणून पहिल्यांदा निवड. डिसेंबर १९८६ मध्ये अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर फेरनिवड. डिसेंबर १९९२ मध्ये अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर तिसऱ्यांदा, १९९८ मध्ये चौथ्यांदा तर २००४ मध्ये पाचव्यांदा फेरनिवड ही त्यांच्या कार्य व कर्तृत्वाची मतदारसंघाने दिलेली पावती ठरते.

डिसेंबर १९९६ मध्ये राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानपरिषदेतील पहिल्या "उत्कृष्ट संसदपटू" पुरस्काराचे मानकरी. **"जीवन गौरव पुरस्कार"** : महामहिम राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते सोमवार, दिनांक २९ जून २००९ रोजी सकाळी ११ वाजता मुंबई येथे विधान भवनाच्या प्रांगणात **"जीवन गौरव पुरस्कार"** प्रदानाने सन्मानित.

**"दक्ष नागरिक पुरस्कार"** : रविवार, दि. २४ जून २००७ रोजी सिटीझन्स फोरम ( नागरिक मंच ) महाराष्ट्र, यांच्यातर्फे **"दक्ष नागरिक पुरस्कार"** प्रदानाने सन्मानित.

**"सावित्रीबाई फुले - फतिमा शेख पुरस्कार"** : रविवार, दिनांक १७ जानेवारी २०१० रोजी सकाळी ११ वाजता पनवेल येथील विठोबा खंडाप्पा हायस्कुलच्या सभागृहात केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाचे सदस्य श्री. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते **"सावित्रीबाई फुले - फतिमा शेख पुरस्कार"** प्रदानाने सन्मानित. राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य या नात्याने ग्रेट ब्रिटन, बेल्जियम, फ्रान्स, नेदरलंड, स्वित्झर्लंड, जर्मनी या देशांच्या अभ्यास दौऱ्यात सहभाग. (२६ सप्टेंबर १९९७ ते १३ ऑक्टोबर १९९७) राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने पाठविण्यात आलेल्या दुसऱ्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य या नात्याने ग्रेट ब्रिटन, इटाली, ऑस्ट्रीया, बेल्जियम, फ्रान्स, नेदरलंड, स्वित्झर्लंड, जर्मनी या देशांच्या अभ्यास दौऱ्यात सहभाग. (४ ऑक्टोबर २००६ ते १९ ऑक्टोबर २००६) महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या (१९९४) विधेयकासाठी महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी नेमलेल्या संयुक्त चिकित्सा समितीचे सदस्य म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या निर्मितीत महत्त्वाचे योगदान. नाशिक येथील १६२ वर्षाची परंपरा लाभलेल्या सार्वजनिक वाचनालयातर्फे सुरू करण्यात आलेल्या कै.माधवराव लिमये स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या **"कार्यक्षम आमदार"** पुरस्काराचे पहिले मानकरी. (८ फेब्रुवारी २००३) महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाच्या संगणकीकरणासंबंधी सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी व सभागृहात त्याबाबतच्या शासनाने दिलेल्या आश्वासनपूर्तीच्या दिरंगाईचा विषय आश्वासन समितीच्या माध्यमातून मार्गी लावण्यात तसेच तदनंतर विधिमंडळाच्या एकूण संगणकीकरण उपक्रमास गती देण्याच्या कामात समिती प्रमुख या नात्याने महत्त्वाचे योगदान.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीचे १९८२ पासून आजतागायत सातत्याने सदस्यत्व. १९८९ मध्ये या समितीचे समिती प्रमुख म्हणून कार्य संचालन. या व्यतिरिक्त विधानमंडळाच्या ग्रंथालय समिती, नियम समिती, विशेषाधिकार समिती, उपविधान समिती इत्यादी समित्यांतून बजावलेली महत्वपूर्ण भूमिका.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे अस्थायी सभापती (Chairman Pro tem) म्हणून जुलै १९९८ मध्ये मा. राज्यपालांकडून नियुक्ती. १९ जुलै १९९८ ते २४ जुलै १९९८ या काळात विधानपरिषदेचे अस्थायी सभापती या नात्याने कार्य.

विदर्भाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व अनुशेष विषयक प्रश्नांची विशेष जाण असलेला सांसद म्हणून लौकिक. "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष : क्ष किरण परीक्षा" या पुस्तकाचे लेखक. अनुशेष विषयक प्रश्नांची विवेचक व अभ्यासपूर्ण चर्चा विधानपरिषदेत घडवून समस्यांचे निराकरण करण्याची त्यांची हातोटी व कार्य बहुमोल, सर्वश्रुत, सर्वविदीत व प्रशंसनीय सिद्ध झाल्याचा सर्वच प्रसारमाध्यमांचा निर्वाळा. अनुशेष निर्मूलनार्थ स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधान मंडळाच्या उभय सभागृहाच्या "अनुशेष निर्मूलन व विकास मंच" या सर्वपक्षीय आमदारांच्या फोरमचे २००१ पासून अध्यक्ष.

"अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ! स्वाध्यायाभ्यासनं चैव" (हितार्थ बोलणे सत्य, प्रेमाने न खुपेलसे, स्वाध्याय करणे नित्य) या वाण्याने आपल्या वाणीच्या सामर्थ्याने इप्सित लक्ष्य टिपणारा एक सुदूरदृष्टीचा आमदार म्हणून सर्वदूर मान्यता. एक अत्यंत अभ्यासू सांसद, प्रभावी वक्ता, आणि उत्कृष्ट संघटक म्हणून महाराष्ट्रभर लौकिक.

******

***प्रा.बी.टी.देशमुखांसारखे जागृत सदस्य असतील तर प्रश्नाला न्याय मिळाल्याखेरीज त्याचा पाठपुरावा करण्याचे थांबत नाहीत. अमरावतीसारख्या महानगरपालिकेला १० टक्के लोकवर्गणी सरकारकडून कशी माफ करून घेतली हे आम्हाला माहित आहे. त्यावेळी त्या खात्याचे श्री. सुब्रम्हण्यम् हे मंत्री होते. त्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्यांना बरोबर शब्दात पकडले आणि त्यामुळे श्री. शंकरराव चव्हाण यांच्यासारख्या मुख्यमंत्र्यांनासुद्धा त्यांची मागणी मान्य करावी लागली. तेव्हा या सभागृहाचे महत्त्व आम्ही जाणून आहोत.-श्री.विलासराव देशमुख***

*महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त 'वरिष्ठ सभागृहाची महत्ता' सांगणारे जे भाषण महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी दिनांक २० जुलै २००० रोजी केले, ते त्यांच्या निवडक भाषणांचा संग्रह असलेल्या कपील पाटील यांनी संपादित केलेल्या व लोकमुद्रा प्रकाशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकात समाविष्ट आहे.*

झालेल्या विकास मंडळे आदेश १९९४ च्या खंड (१०) अनुसार "राज्यपाल सबंध राज्याच्या गरजा साकल्याने विचारात घेऊन, राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमधील नोकऱ्यांमध्ये प्रत्येक विकास मंडळाच्या क्षेत्रात पुरेशा संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्याय्य व्यवस्था करण्याची खातरजमा करतील आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाला वेळोवेळी योग्य ते निदेश देतील" अशी तरतुद आहे. प्रत्यक्षात या नियमाच्या अम्मलबजावणीसाठी कोणतीहि कारवाई करण्यात आली नाही.

१४.४. राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमधील तिन्ही प्रदेशांतील प्रतिनिधीत्वाचा अभ्यास करण्यासाठी राज्यपालांनी, ऑक्टोबर १९९६ मध्ये **विकास मंडळाची रोजगार विषयक संयुक्त समिती गठीत केली.** शासन धार्जिण्या अधिकाऱ्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या या समितीने, याबाबतीत कोणताही हस्तक्षेप आवश्यक नाही असा अहवाल ऑक्टोबर १९९८ मध्ये राज्यपालांना सादर केला. समाधान न झालेल्या राज्यपालांनी परिस्थितीचा नव्याने आढावा घेण्यासाठी मे २००३ मध्ये विकास मंडळांची पुन्हा संयुक्त समिती स्थापन केली. या समितीने राज्यपालांना १० ऑगस्ट २००४ रोजी आपला अहवाल सादर केला. आता मा. राज्यपाल या अहवालावरील राज्य शासनाच्या मताची प्रतिक्षा करीत आहेत. ते मत त्यांना अजूनही मिळाले नाही. मिळाले असल्यास त्यावर त्यांनी काहिही कारवाई केलेली नाही. झाला हा खेळखंडोबा पुष्कळ झाला. **आता मा. राज्यपालांनी १ जानेवारी २०११ पासून नोकरभरतीमध्ये तीनही विभागांना समन्यायी वाटप प्रदान करणारे निदेश लागू करावे व ३० डिसेंबर २०१० पर्यंतच्या काळातील नोकरभरतीमधील असमतोलाचा अहवाल तयार करण्याचे आदेश द्यावेत व पुढील ३ महिन्यात तो अहवाल जाहिर करावा.**

### *वीजेच्या वापरात समन्यायी वाटप*

१५. **विजेचा वापर घरगुती व कृषिपंपासाठी, विजवितरणाची साधनसामुग्री व विजउत्पादनाचे प्रकल्प यांचे समन्यायी वाटप** : याबाबत वारंवार मा. राज्यपालांना निवेदने देण्यात आलेली आहेत. पण त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही.

**१५.१. विजेचा दरडोई वापर हा समन्यायी असावा : राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सर्व प्रकारच्या वापरासाठी विजेचा दरडोई वापर हा समन्यायी असावा अशी ही मागणी आहे.** मागणीनुसार विजेचा पडणारा तुटवडा लक्षात घेता विविध क्षेत्रामध्ये किंवा जिल्ह्यामध्ये अशा प्रकारे भारनियमन करण्यात यावे की, सर्व जिल्ह्यामध्ये दरडोई वापर हा समान राहील.

१५.२. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कृषी वापरातील विजेचे अशाप्रकारे भारनियमन करण्यात यावे की, **विजेचा दर हेक्टरी वापर राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये समान राहील.** शेतीसाठी वापरात असलेल्या पंपावर विजेच्या मोटारी बसविणे म्हणजेच "कृषीपंपाचे विद्युतीकरण" हे एक अतिशय महत्त्वाचे विकासक्षेत्र आहे. ३१ मार्च १९८३ अखेर राज्यात ७,९०,६४५ पंपावर विजेच्या मोटारी बसविण्यात आल्या होत्या ३१ मार्च २००१ रोजी ही संख्या २३,२७,७१६ झालेली आहे. राज्यसरासरीचा विचार करता ३१ मार्च १९८३ रोजी दर हजार हेक्टर वाहीतीखालील जमिनीमागे ३८.७८ पंपाचे विद्युतीकरण झालेले होते. तर ३१ मार्च २००१ रोजी सरासरीने दर हजार हेक्टर वाहीतीखालील जमिनीमागे १२८.८७ पंपाचे विद्युतीकरण झालेले होते. आत्महत्यांच्या संदर्भात विद्युत भारनियमनाचा वेगळेपणाने विचार केला पाहिजे असे मत ठामपणे व्यक्त करण्यात येत आहे. अगोदरच शासकीय खर्चाने कालव्याचे पाणी उपलब्ध झालेल्या जलसिंचन या विकास क्षेत्रातील बिगर अनुशेष जिल्ह्यामध्ये कृषीपंपाची संख्या जास्त आहे. कोरडवाहूच्या अनुशेष जिल्ह्यामध्ये कर्ज काढून विहीर बांधलेली असल्याने अशा पंपाची संख्या त्या मानाने फारच कमी आहे. उदाहरणच द्यायचे झाल्यास सन २००१ च्या अधिकृत आकडेवारीनुसार एकट्या नगर जिल्ह्यात विद्युत जोडणी मिळालेल्या कृषीपंपांची संख्या २,३३,०६८ इतकी आहे तर जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती विभागाच्या पाच जिल्ह्यामध्ये ही संख्या २,८५,१६० इतकी आहे. तिकडे एकट्या नाशिक जिल्ह्यामध्ये कृषी पंपांची संख्या २,००,२७० इतकी आहे तर नागपूर विभागाच्या सर्व सहा जिल्ह्यामध्ये ही संख्या १,७८,४८७ इतकी आहे. हा अनुशेष तत्परतेने दुर करण्यात आला पाहिजे.

**१५.३. विदर्भात पायाभूत सुविधांचे समन्यायी वाटप** : अती उच्च दाब उपकेंद्र, उच्च दाब वाहिन्या, वितरण रोहीत्रे यासारख्या पायाभूत सोयी विदर्भात ग्राहकांना (वाढीव) वीज पुरवठा करण्यासाठी राज्यातील विकसीत भागाप्रमाणे समतुल्याने उपलब्ध करण्यात याव्या. या विकासाकरिता अर्थसहाय्यामध्ये येणाऱ्या अडचणींना वरचे प्राथम्य देण्यात यावे आणि कृषी पंपाचा अनुशेष कमी केल्यामुळे विदर्भाचा अनुशेष कमी करण्यास चालना मिळेल.

**१५.४. जादा वापर (लोड सेंटर) केंद्रांच्या जवळ नवीन वीज प्रकल्पाची स्थापना करण्यात यावी : औष्णिक वीज प्रकल्पाच्या कार्यान्वयनाचा आणि सभोवतालच्या क्षेत्रातील दुष्परिणामाचा विचार करता, राज्यामध्ये केवळ वीजभार (लोड सेंटर) केंद्राचे जवळ नवीन वीज प्रकल्पाची स्थापना करण्यात यावी त्यामुळे पारेषणाची हानी कमी होईल आणि वीज पुरवठ्याचा दर्जा सुधारेल.**

## विधिमंडळ भूषण म्हणूनही त्यांचा गौरव केला तरी ते यथायोग्य होईल - श्री. प्रमोद नवलकर

*"सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या बाबतीत मी असे म्हणेन की, सभागृहामध्ये आल्यापासून त्यांच्याकडून माझ्यासारख्यांना खूप काही शिकण्यासारखे आहे. त्यांचा अभ्यास विशेषतः जुनी कात्रणे काढून त्यांचा अभ्यास करणे आणि सत्ताधारी पक्षाला आणि मंत्री महोदयांना नामोहरम करणे ही सोपी गोष्ट नाही. एखाद्या खात्याच्या संबंधात त्यांनी प्रश्न विचारलेले असतील तर मंत्री त्यांना सकाळी फोन करून विचारतात की, तुम्ही कोणकोणते प्रश्न विचारणार आहात म्हणजे आम्ही त्या प्रमाणे चांगली तयारी करून येतो. अशा प्रकारे समतोल विचारांचे, अभ्यासू, व्यासंगी आणि सभागृहाला अभिमान वाटावे असे त्यांचे या ठिकाणचे कामकाज पाहिल्यानंतर केवळ आदर्श म्हणून नव्हेतर **विधिमंडळ भूषण म्हणूनही त्यांचा गौरव केला तरी ते यथायोग्य होईल** असे मला वाटते.* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १०९, क्रमांक ८, पृष्ठ क्रमांक ३७ बुधवार, दिनांक १८ डिसेंबर १९९६) *श्री. प्रमोद नवलकर, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, व शिवसेना नेते.*

## प्राध्यापक आणि शिक्षकांच्या हिताचे रक्षण करीत असतानाच सर्वसामान्य जनतेचे प्रश्नसुध्दा त्यांनी मांडले आहेत.
## - श्री.रा.सू.गवई

*"पदवीधर मतदारसंघातून ते निवडून आलेले असल्यामुळे केवळ **प्राध्यापक आणि शिक्षकांच्या संदर्भातच त्यांची कमिटमेंट असली तरी सुध्दा त्यापासून डेव्हीएट न होता प्राध्यापक आणि शिक्षकांच्या हिताचे रक्षण करीत असतानाच सर्वसामान्य जनतेचे प्रश्नसुध्दा त्यांनी मांडले आहेत.** इतकेच नव्हे तर राज्यातील पाटबंधाऱ्याचे असंतुलन, विभागाचे प्रश्न त्यांनी मांडले आहेत. राज्यातील जलसिंचनाच्या बाबतीत रिव्ह्यू करण्यासंबंधीची पुस्तिका त्यांनी तयार केलेली आहे."* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ३ डिसेंबर १९९२, खंड ९७, क्रमांक ४, पृष्ठ ५८) *श्री. रा.सु.गवई, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, माजी लोकसभा सदस्य व आर.पी.आयचे अध्यक्ष, केरळचे मा.राज्यपाल*

विजेचे उत्पादन राज्यासाठी आवश्यक आहे यात शंकाच नाही पण त्यामुळेच उत्पादित वीजेचे व वीज उत्पादन प्रकल्पांचे समन्यायी वाटप करणे आवश्यक आहे.

१५.५ "**REPORT** on need of regionwise equitable distribution of energy and load sheding" या शिर्षकाचा एक अहवाल **दिनांक २० नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या वैधानिक विकास मंडळाच्या बैठकीत विचारात घेण्यात आला व सम्मत करण्यात आला.** तज्ज्ञ सदस्य श्री. मधुकरराव किम्मतकर हे या समितीचे अध्यक्ष होते. **वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. तुकारामजी बिडकर यांनी हा अहवाल मा. राज्यपालांना त्यांच्या दिनांक २६ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये (D.O. No. 116/Chairman/ RO/2008/761) सादर केला.**

१५.६. उपरोक्त उपपरिच्छेद १५.१ व १५.२ मध्ये करण्यात आलेली मागणी या अहवालाच्या आठव्या प्रकरणाच्या परिच्छेद ८.३ मध्ये करण्यात आलेली आहे. उपपरिच्छेद १५.३ मधील मागणी याच अहवालाच्या परिच्छेद ९.३ मध्ये व उपपरिच्छेद १५.४ मधील मागणी परिच्छेद ९.२ मध्ये करण्यात आलेली आहे. आज हा अहवाल मा. राज्यपालांना सादर होवून दोन वर्षाचा काळ लोटून गेला पण मा. राज्यपालांनी त्यावर कोणतीही कारवाई केली नाही.

१५.७. विजेचे उत्पादन राज्याला आवश्यक आहे यात शंका असण्याचे कारण नाही म्हणूनच राज्याच्या सर्व भागामध्ये अशा प्रकल्पांचे समन्यायी वाटप झाले पाहिजे, राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सर्व प्रकारच्या वापरासाठी विजेचा दरडोई वापर हा समन्यायी असावा, त्याचप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी वापरातील विजेचे अशाप्रकारे भारनियमन करण्यात यावे की, विजेचा दर हेक्टरी वापर राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये समान राहील, अती उच्च दाब उपकेंद्र, उच्च दाब वाहिन्या, वितरण रोहीत्रे यासारख्या पायाभूत सोयी विदर्भात ग्राहकांना (वाढीव) वीज पुरवठा करण्यासाठी राज्यातील विकसीत भागाप्रमाणे समतुल्याने उपलब्ध करण्यात याव्या. याबाबतचे निदेश मा. राज्यपालांनी तत्परतेने लागू करावे अशी मागणी करण्यात येत आहे.

१५.८. मा. पंतप्रधानांच्या निदेशावरुन योजना आयोगाची एक समिती श्रीमती आदर्श मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली विदर्भात येवून गेली. या समितीच्या अहवालात पुढील महत्वपूर्ण निष्कर्ष आढळून येतात.

"The common refrain is that though majority of electric power is produced Vidarbha area, the energy requirements of Vidarbha, in particular for the Energisation of agriculture pumps is not fulfilled as compared to the Western Maharashtra."

१५.९. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या २००६-२००७ च्या अहवालात (CAG Report 2006-07) पुढील ताशेरे आहेत :-

"3.2 million Vidarbha farmers consume 11% of total electricity while sugarcane belt of maharashtra accounts for 65.5 %. Six sugar growing districts of Pune Division had 3.57 lakh pumpsets i excess of the rightful share, while Vidarbha had deficit of 2.15 lakh pumps. 60% of State's electricity is generated in vidarbha. It has power but is politically powerless."

### *उद्योगाचा अनुशेष*

१६. **उद्योगाच्या बाबतीत खाजगी उद्योगपतींकडून दिल्या जाणाऱ्या वागणूकीबद्दल शासनाला दोष देता येत नाही, हे खरे असले तरी उद्योगांच्या विकासासाठी कामे करणाऱ्या शासन नियंत्रीत वित्त पुरवठा संस्था ज्या वेळी वर्षानुवर्षे भेदभावपूर्ण वागणूक देतात, त्यावेळी त्यातून निर्माण होणाऱ्या स्थितीचे स्वामित्व हे घटनेने विशेष जबाबदारी सोपविलेली असल्यामुळे राज्यपालांनाच स्विकारावे लागेल.** विभागीय आयुक्तांचे मुख्यालय व महानगरपालिका असलेल्या मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर व अमरावती या सहा शहराच्या/ जिल्ह्याच्या बाबतीत औद्योगीक विकासामधील शासन नियंत्रित वित्तीय संस्थाचा सहभाग अवलोकन करण्यासारखा आहे. खालील आकडे हे अधिकृत असून सत्यशोधन समितीच्या अहवालातून घेतले आहेत व ते विभागीय मुख्यालयाच्या नावे दाखविण्यात आले असले तरी त्या जिल्ह्याचे आहेत व त्या महसुली विभागावर झालेल्या अन्यायाचे प्रतिनिधीत्व करण्यास पूरेसे आहेत.

१६.१. **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ :** राज्याच्या विशेषतः राज्यातील विकसनशील व मागास भागाचा औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने ज्या प्रमुख संस्थांची निर्मिती केली त्यामध्ये १९६२ साली महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. राज्यामध्ये वेगाने व सुव्यवस्थितरित्या उद्योग धंद्याची स्थापना व वाढ व्हावी या करीता सर्व प्रकारे सहाय्य करणे हे या महामंडळाचे उद्दीष्ट आहे. **राज्याच्या वेगवेगळ्या भागामध्ये हे महामंडळ औद्योगिक क्षेत्र विकसित करते आणि उद्योगधंदे काढण्यासाठी रस्ते, पाणी, वीज व इतर मुलभूत सोयीसह जागा व इमारती (शेड) उपलब्ध करून देते.** हे महामंडळ स्थापन झाल्यापासून तर मार्च १९८३ पर्यंत वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये औद्योगिक वसाहती क्षेत्रे विकसित करण्यासाठी या महामंडळाने एकूण खर्च किती केला व दरडोई खर्च किती केला याचे आकडे पुढील प्रमाणे आहेत. **एकूण खर्च बृहन्मुंबईमध्ये रु. ५७.११ कोटी, नाशिकमध्ये रु. ४.७६ कोटी, पूणे रु. ९.८९ कोटी, औरंगाबाद रू. ६.५८ कोटी शेवटून दुसरा क्रमांक नागपूरचा लागतो तेथे रू. ३.६५ कोटी व शेवटचा क्रमांक अमरावतीचा लागतो तेथे फक्त ७२ लाख रुपयाचा खर्च या मंडळाने ३१ मार्च १९८३ पावेतो केलेला आहे.** लोकसंख्या लक्षात घेता या महामंडळाने या सहा शहरात/ जिल्ह्यात या खात्यावर **दरडोई खर्च** किती केला आहे याची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे. **बृहन्मुबई मध्ये ६९ रूपये, नाशिक १५ रुपये, पूणे २३ रूपये, औरंगाबाद २७ रूपये, शेवटून दुसरा क्रमांक नागपूरचा लागतो दरडोई १४ रूपये आणि शेवटचा क्रमांक अमरावतीचा म्हणजे दरडोई ४ रूपये** अशी ही खर्चाची विगत आहे.

१६.२. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने केलेल्या या सर्व

***श्री.बी.टी.देशमुख यांची तयारी नाही असा कोणताही दिवस नाही, कोणताही विषय नाही, किंबहुना जी. आर. कधी निघाला, त्यात काय आहे यांपासून सभागृहामध्ये कोणी काय सांगितले या प्रत्येक बाबींची नोंद बी.टी. यांच्या फाईलमध्ये असते. त्याचा परिणाम असा होत असतो की, जो कोणी उत्तर देणारा मंत्री असतो त्याची फार फजिती होते. कारण बी.टी. जवळ जे जे असते ते मंत्र्याकडेसुध्दा नसते.- मा. सभापती श्री. जयंतरावजी टिळक***

*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन खंड ९७ क्रमांक ४ पृष्ठ ५४ ते ६८, ३ डिसेंबर १९९२)*

## विषयाच्या मुळाशी जाऊन, सत्यशोधन करून मांडण्यामध्ये त्यांच्या इतका दुसरा कोणाचा हातखंडा आहे असे मला वाटत नाही.
## - श्री.अण्णा डांगे

*"प्रा.बी.टी.देशमुख हे अतिशय चिकित्सक अभ्यासू आणि हजरजबाबी सदस्य म्हणून त्यांची आपल्या सभागृहामध्ये ख्याती आहे. ते येण्याने अनेक विषयांना न्याय मिळेल असे मला वाटते.* ***कारण एखाद्या विषयाच्या मुळाशी जाऊन त्याचे सत्यशोधन करून सभागृहामध्ये मांडण्यामध्ये त्यांच्या इतका दुसरा कोणाचा हातखंडा आहे असे मला वाटत नाही."***

- (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ३ डिसेंबर १९९२, खंड ९७, क्रमांक ४, पृष्ठ ५५) *श्री. अण्णासाहेब डांगे, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, माजी ग्रामविकास मंत्री.*

खर्चाचा परिणाम भांडवली गुंतवणूक आणि रोजगार यांच्यावर काय झालेला आहे ते पाहणे सुद्धा आवश्यक आहे. ३१ मार्च, १९८३ अखेर राज्यभर महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये एकंदर ६००६ उद्योग चालू होते. या उद्योगामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने केलेली जी भांडवली गुंतवणूक आहे, **ही भांडवली गुंतवणूक दरडोई किती रूपये पडते याची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे. बृहन्मुंबईत ७८८ रूपये, नाशिक ४६८ रूपये, पुणे ८३५ रूपये, औरंगाबाद ४३७ रूपये शेवटून दुसरा क्रमांक नागपूरचा लागतो तेथे हे प्रमाण दरडोई १४९ रुपये आणि सर्वात शेवटचा क्रमांक अमरावतीचा लागतो. तेथे दरडोई ९ रुपये अशी ही स्थिती आहे.**

१६.३. ही जी भांडवली गुंतवणूक झाली तीचा रोजगारावर काय परिणाम झालेला आहे, हे सुद्धा पाहण्याच्या दृष्टीने ३१ मार्च १९८३ अखेर महामंडळाच्या राज्यभरातील औद्योगिक वसाहतीमध्ये जे एकंदर ६,००६ उद्योग चालू होते या उद्योगांमधील कामगारांची संख्या **बृहन्मुंबई मध्ये प्रती लक्ष लोकसंख्येमागे १२४३, नाशिक ८४६, औरंगाबाद ७३४, पुणे ८५५, शेवटून दुसरा क्रमांक नागपूरचा तेथे ही संख्या ४१३ आणि सर्वात शेवटचा क्रमांक अमरावतीचा तेथे ही संख्या २० असल्याचे आढळून येते.**

**१६.४. सिकॉम (महाराष्ट्र राज्य औद्योगिक गुंतवणूक महामंडळ) ही उद्योगधंद्याच्या विकासासाठी राज्य शासनाने स्थापन केलेली दुसरी प्रमुख संस्था होय,** राज्याच्या अविकसित प्रदेशाचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी खास करून या संस्थेची स्थापना १९६६ साली करण्यात आली. **अविकसीत प्रदेशावरच सिकॉमने आपली शक्ती पूर्णपणे केंद्रीत करावी या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश व पुणे महानगर प्रदेश हे दोन प्रदेश सिकॉमच्या कार्यकक्षेमधून वगळले आहेत.** अविकसित भागामध्ये उद्योगधंदे उभारणाऱ्या उद्योजकांना विविध सोयी सवलती सिकॉम तर्फे दिल्या जातात. प्रकल्पाची आखणी, प्रकल्पास प्रोत्साहन व सहाय्य, भांडवली गुंतवणूकीबाबत मार्गदर्शन, उद्योग उभारणी सेवा, खर्चाच्या स्वरूपात वित्त सहाय्य, व्यापारी बँकींग आणि औद्योगिक मार्गदर्शन सेवा अशा विविध प्रकारे सिकॉम उद्योजकांना उद्योगाच्या उभारणीत मदत करते. सिकॉम मुख्यत्वे करून दीर्घ मुदतीची कर्जे देऊ करते पण अल्प मुदतीची कर्जेही काही प्रमाणात सिकॉम तर्फे दिली जातात.

१६.५. १ एप्रिल, १९८३ पावेतो सिकॉमने एकंदर १४६९ उद्योगांना सहाय्य मंजूर केले होते. मंजूर केलेल्या सहाय्याची एकूण रक्कम ३०६.२३ कोटी रूपये होती या पैकी २०४.५५ कोटी रूपयाचे प्रत्यक्ष वाटप सर्व जिल्ह्यात केले गेले. ३१ मार्च, १९८३ अखेर सिकॉमने दिलेल्या वित्त सहाय्याच्या या वाटपामध्ये या सहा महानगरांची/जिल्ह्यांची आकडेवारी ही पूढील प्रमाणे आहे. **बृहन्मुंबई व पुणे हे महानगर प्रदेश सिकॉमच्या कार्यकक्षेतून वगळण्यात आलेले होते. नाशिक रु. २०.२४ कोटी, औरंगाबाद रु. २५.६४ कोटी नागपूर शेवटून दुसरा क्रमांक रू. १७.१९ कोटी आणि अमरावती शेवटचा क्रमांक ४८ लाख रूपये ही सुरूवातीपासून ३० मार्च, १९८३ पर्यंत सिकॉमच्या अर्थसहाय्याची वितरीत केलेली रक्कम आहे.** सिकॉमने प्रत्यक्ष ही जी रक्कम वितरित केलेली आहे ती विचारात घेता या सहा शहरामध्ये/जिल्ह्यामध्ये दरडोई खर्चाची बिगत ही पुढील प्रमाणे येते. मुंबई आणि पुणे हे महानगरप्रदेश सिकॉमच्या कार्यकक्षेतून वगळण्यात आलेले होते. **नाशिक मध्ये दरडोई खर्च ६७ रुपये, औरंगाबाद १०५ रूपये, नागपूर शेवटून दुसरा क्रमांक म्हणजे दरडोई खर्च ६६ रुपये आणि अमरावती मध्ये हा खर्च २ रूपये अशी दरडोई खर्चाची बिगत आहे.**

**१६.६. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने दिलेल्या वित्त सहाय्याचाही याच पद्धतीने आढावा घेणे आवश्यक आहे.** महामंडळाच्या व्यवहाराची पातळी, सिकॉमच्या व्यवहाराच्या पातळीशी तुल्यबळ आहे. २ कोटी रूपयापेक्षा कमी गुंतवणूक असलेल्या उद्योग प्रकल्पांना वित्त पुरवठा सामान्यतः सिकॉम आणि महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ या सारख्या राज्य पातळीवरील संस्थांकडून होतो. ज्यांची एकूण भांडवली गुंतवणूक ५० लाखाहून अधिक नाही, अशा लघु आणि मध्यम उद्योगांना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ वित्त पुरवठा करते. राज्य वित्तीय महामंडळ जास्तीत जास्त ३० लाखापर्यंत कर्ज देऊ शकते. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने ३१ मार्च, १९८३ पर्यंत एकूण रुपये २३० कोटीचे वित्त सहाय्य महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांना दिलेले असून त्यातील या सहा महानगरपालिकेच्या जिल्ह्यांच्या बाबतची स्थिती पुढील प्रमाणे आहे. **बृहन्मुंबई ४० कोटी रूपये, नाशिक ७ कोटी रुपयै, पुणे २१ कोटी रूपये, औरंगाबाद १७ कोटी रुपये, नागपूर १४ कोटी रुपये आणि अमरावती २.४५ कोटी रूपये, दरडोई हा खर्च किती करण्यात आला याचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे. बृहन्मुंबई ४८ रुपये, नाशिक २४ रूपये, पूणे ५१ रुपये, औरंगाबाद ७३ रूपये, नागपूर ५७ रुपये आणि अमरावती फक्त १३ रुपये असे हे प्रमाण**

## सारा इतिहास ते सभागृहासमोर उभा करतात आणि मग तो प्रश्न सोडवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहतात.
## - श्री.अरूण मेहता

*"या सदनात उत्कृष्ट संसदपटू म्हणून प्रा.बी.टी.देशमुख यांना सन्मान दिला गेला आहे हे अत्यंत उचित आहे, योग्य आहे आणि सार्थकी लागल्याचे आहे असे मला वाटते. सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या विषयी सर्वांना चांगला अनुभव आहे. ते एखाद्या प्रश्नाचा मागोवा करतात, म्हणजे त्या मंत्र्याने किती आश्वासने आजतागायत दिली. कोणत्या तारखेला कोणत्या अधिवेशनात दिली, त्याचा प्रश्न क्रमांक काय होता याच्यापासून* ***सारा इतिहास ते सभागृहासमोर उभा करतात आणि मग तो प्रश्न सोडवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहतात. अमरावतीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी ज्या स्वरूपात लावून धरला,*** *मला असे वाटते की, त्यांच्याऐवजी दुसरे कोणीही असते तरी १० टक्क्याची सूट मिळाली नसती, परंतु माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी वेगवेगळया आयुधांचा वापर करून प्रश्न लावून धरला आणि सोडवून घेतला.* ***त्याचबरोबर मेडिकल प्रवेशांच्या बाबतीत लोकसंख्येच्या आधारावर जागांचे समन्यायी वाटप हा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी धरलेला आग्रह आपणा सर्वांना माहित आहे, तसेच अमरावतीचा बायपास असेल,अकोला शहराची पूररेषा असेल,हे सर्व प्रश्न सोडवताना प्रा.बी.टी.देशमुख यांना या सदनाने पाहिले आहे."***

-(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १०९, क्रमांक ८, पृष्ठ क्रमांक ३८ बुधवार, दिनांक १८ डिसेंबर १९९६) *श्री. अरूण मेहता, तत्कालीन विधान परिषद सदस्य*

# आमदाराने आपणासाठी कामे केली की मतदार त्यांना परत कौल देतात - श्री. सुधीर जोशी

*"आपल्या भागासाठी आपल्या आमदाराने काय केले याची लोक आठवण ठेवतात. हे आपण देखील लक्षात ठेवले पाहिजे . आपण निवडून दिलेल्या **आमदाराने आपणासाठी कामे केली की मतदार त्यांना परत कसा कौल देतात हे मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या निवडणुकीच्या वेळी मतदारांनी दिलेला कौल पाहता** कोणालाही पटण्यासारखे आहे."*

- (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ५ डिसेंबर १९८६, खंड ७८, क्रमांक १०, पृष्ठ ५७ ते ५८) *श्री. सुधीर जोशी, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, माजी शिक्षणमंत्री.*

आहे.

१६.७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ यांची स्थापना करण्याव्यतिरिक्त **महाराष्ट्र शासनाने प्रोत्साहक अर्थ सहाय्य देऊ करणारी एक उत्तेजनाची सामुहिक विकास योजना लागू केलेली होती.** १९६४ मध्ये ही योजना प्रथम लागू केली गेली. १९७० साली भारत सरकारने केंद्रीय भांडवली अर्थ सहाय्य योजना जाहीर केली. शासनाच्या योजनेप्रमाणे मोठ्या आकाराच्या उद्योगांना अर्थसहाय्याचे वाटप सिकॉम तर्फे होते, तर लघू उद्योगांना त्या त्या प्रदेश विकास महामंडळामार्फत ते केले जाते. **राज्य शासनाची सामुहिक उत्तेजन योजना आणि केंद्र सरकारची केंद्रीय भांडवली अर्थ सहाय्य योजना या योजनांखाली दिल्या गेलेल्या सहाय्याविषयीची ३१ मार्च, १९८३ पावेतोची सामुहिक उत्तेजन योजनेअंतर्गत व केंद्रीय आकडेवारी सुद्धा पाहण्यासारखी आहे. बृहन्मुंबई आणि पुणे महानगरप्रदेश यांना ही योजना लागू नाही. नाशिक मध्ये १०.६६ कोटी रुपये, औरंगाबाद १२.४९ कोटी रूपये, नागपूर शेवटून दुसरा क्रमांक म्हणजे ५ कोटी रूपये आणि अमरावती ६० लाख रुपये अशी ही रक्कम आहे.**

१६.८. **कारखानदारी रोजगार :** शासनाने नियंत्रित केलेल्या वित्तीय संस्थांनी उद्योगधंद्यांना सहाय्य करण्याच्या संदर्भात जे धोरण स्विकारले त्याच्या परिणामी प्रति लक्ष लोकसंख्येमध्ये किती लोकांना कारखान्यातील रोजगार उपलब्ध झाला याची आकडेवारी पुढील प्रमाणे आहे. **बृहन्मुंबई मध्ये प्रती लक्ष लोकसंख्येमध्ये ७३२४, नाशिक १३०१, पुणे ३१०१, औरंगाबाद १०२५, नागपूर १५३१ व अमरावती ५१६ आहे. "दरलाख लोकसंख्येमागे किती लोकांना कारखानदारी रोजगार मिळतो"** असा मापदंड धरून उद्योग या विकासक्षेत्रातील प्रादेशिक असमतोल ठरविण्यात आला आहे. राज्यामध्ये १९८१ मध्ये ५८८,३४४ कामगारांना कारखानदारी रोजगार उपलब्ध होता. **"एक लक्ष लोकसंख्येमागे मध्ये १०७९ कामगारांना कारखानदारी रोजगार उपलब्ध होतो"** अशी राज्य सरासरी आहे व त्यावेळी नागपूर सोडून विदर्भ व मराठवाड्यातील सर्व जिल्हे राज्यसरासरीच्या खाली आहेत म्हणजे अनुशेषात आहेत. आज या क्षेत्रातील अनुशेष फार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याबाबतसुद्धा आक्रमक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटते.

१६.९. सारख्याच प्रकारचे उत्तेजन राज्य शासनाकडून मिळणार असेल तर खाजगी उद्योजक मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, बेलापूर असे विकसित भाग सोडून अविकसित भागामध्ये किंवा अनुशेष ग्रस्त भागामध्ये कशासाठी उद्योग काढतील? हा यातील खरा प्रश्न आहे. "उत्तेजनांची लवचिकता" (Flexibility of incentives) ही त्यावरील मुख्य उपाययोजना आहे. "चढत्या क्रमाने उत्तेजनांची मात्रा वाढविणे" या धोरणाचा स्वीकार व्हावा. जिल्हा जेवढा या विकास क्षेत्रात मागे असेल तेवढी उत्तेजनांची मात्रा वाढवावी लागेल. **"प्रतिलक्ष लोकसंख्येमध्ये उपलब्ध कारखानदारी रोजगार"** या मापदंडानुसार जो जिल्हा राज्यसरासरीवर आला असेल तेथे उत्तेजनांची मात्रा टप्प्याटप्प्याने कमी करून क्रमशः इतर विकसित जिल्ह्यांच्या समस्तरावर आणता येईल असे आम्हाला वाटते, **हे एक व दुसरे म्हणजे** या धोरणानुसार उद्योजकांना आकर्षित करण्याबरोबर शेतीपूरक उद्योगांसाठी थेट शेतकऱ्यांना उत्तेजना द्यावी लागेल. **असे करतांना या दोनही बाबतीत सर्व जिल्ह्यांना सारखे धोरण या सूत्राचा अवलंब न करता अनुशेषाच्या प्रमाणात उत्तेजनांची मात्रा ठेवावी लागेल. विषम स्तरावरील जिल्ह्यांना समान स्तरावरील वागणूक देण्याचा मोह आवरून विकासाच्या म्हणा किंवा असमतोलाच्या म्हणा समान स्तरावर असलेल्या जिल्ह्यांना समान वागणूक देण्याचा निर्धार व्यक्त करण्याची वेळ निश्चितपणे आलेली आहे तो निर्धार व्यक्त करणारे पुढील निदेश राज्यपालांनी तत्परतेने निर्गमित करण्याची गरज आहे.**

(१) "उत्तेजनांची लवचिकता" (Flexibility of incentives) ही त्यावरील मुख्य उपाययोजना आहे. "चढत्या क्रमाने उत्तेजनांची मात्रा वाढविणे" या धोरणाचा स्वीकार व्हावा. जिल्हा जेवढा उद्योग या विकास क्षेत्रात मागे असेल तेवढी उत्तेजनांची मात्रा वाढवावी लागेल. **"प्रतिलक्ष लोकसंख्येमध्ये उपलब्ध कारखानदारी रोजगार"** या मापदंडानुसार जो जिल्हा राज्यसरासरीवर आला असेल तेथे उत्तेजनांची मात्रा नंतर टप्प्याटप्प्याने कमी होण्याचे निदेश निर्गमित होणे गरजेचे आहे.

(२) उद्योगांच्या विकासासाठी कामे करणाऱ्या शासन नियंत्रीत वित्त पुरवठा संस्थांनी मागास जिल्ह्यामध्ये ते मागासलेपण दुर होण्यासाठीचे धोरण स्विकारावे असे स्पष्ट निदेश देणे गरजेचे आहे.

(३) उद्योगाचा अनुशेष दुर करतांना खूप पाणी गिळणारे व सिंचनाचा अनुशेष वाढविणारे उद्योग अनुशेष ग्रस्त भागात येता कामा नये याबाबत निदेश देवून स्पष्ट बंधने राज्यपालांनी घालुन देणे आवश्यक आहे.

### *अनुशेषाची इतर क्षेत्रे*

१७. असमतोल असलेल्या सर्वच क्षेत्राचा तपशीलवार उहापोह करण्याचे हे ठिकाण नाही पण अशा सर्वच क्षेत्रांच्या बाबतीत मा. राज्यपालांनी निदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे.

### *विधानमंडळ सदस्यांनी केलेले प्रयत्न*

१८.१. मा. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ ला आदेश निर्गमित केला व महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविली. प्रा.बी.टी.देशमुख यांनी मा. राज्यपालांना दिनांक ३० ऑक्टोबर १९९४ रोजी एक निवेदन सादर केले. (हे संपूर्ण निवेदन सन १९९६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १०४

# या सभागृहात सर्वात वरचे नाव जर घ्यायचे ठरविले तर ते बी.टी. देशमुख यांचेच घ्यावे लागेल - श्री.सु.र.वहाडणे

*"श्री.बी.टी.देशमुख हे एक लढाऊ आमदार आहेत **विशेषतः शैक्षणिक क्षेत्रातील प्रश्न अत्यंत आखीव, रेखीव तडफेने आणि सर्वप्रकारचे संदर्भ देऊन मांडण्यात या सभागृहात सर्वात वरचे नाव जर घ्यायचे ठरविले तर ते श्री. बी.टी.देशमुख यांचेच घ्यावे लागेल** असे मी म्हणतो."*

- (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ५ डिसेंबर १९८६, खंड ७८, क्रमांक १०, पृष्ठ ५२) *श्री. सु.र.वहाडणे, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, नंतर उपसभापती व नंतर राज्यसभा सदस्य, माजी अध्यक्ष महाराष्ट्र भारतीय जनता पक्ष*

# काही जागा यांच्यासारख्या सभासदांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत. - श्री.व्यंकप्पा पत्की

***"प्रत्येक पक्षाने काही जागा श्री.डी.बी.पाटील आणि श्री.बी.टी.देशमुख यांच्यासारख्या सभासदांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत.** म्हणजे या सभागृहामध्ये नव्याने येणारी जी तरुण मंडळी आहेत त्यांना उत्तम प्रकारे मार्गदर्शन होऊ शकेल. सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख हे या ठिकाणी प्रश्न विचारतात त्यावेळी ते अनेक दाखले या ठिकाणी देतात आणि आपल्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून घेतात आणि विधिमंडळाची कार्यक्षमता किती आहे हे दाखवितात."* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १०९, क्रमांक ८, पृष्ठ क्रमांक ४१, बुधवार, दिनांक १८ डिसेंबर १९९६) *श्री. व्यंकप्पा पतकी, तत्कालीन विधानपरिषद सदस्य व जनता दल नेते.*

व १०५ वर प्रसृत करण्यात आले आहे.) १३ परिच्छेदाच्या या निवेदनासोबत एक परिशिष्ट जोडले असून सर्वच क्षेत्रातील अनुशेष दुर (मुख्यत्वे सिंचन) करण्याविषयी निश्चित उपाययोजना मा. राज्यपालांना सुचविल्या होत्या. राष्ट्रपतींचे आदेश निघाल्यावर असे निवेदन देणारा बी.टी.देशमुख हा खचितच पहिला विधानमंडळ सदस्य असेल. दुसऱ्या कोणी असे निवेदन दिल्याचे लक्षात आणून दिल्यास हा क्रमांक बदलविता येईल.

**१८.२.** विधानमंडळामध्ये अनुशेष निर्मुलनाच्या या कामात अनेक सदस्यांनी पुढाकार घेतला. विशेषतः सर्वश्री. नितिन गडकरी, रणजीत देशमुख व श्री. दत्ता मेघे यांच्या पुढाकाराने सन २००१ मध्ये अनुशेष निर्मूलन व विकास मंच या सर्वपक्षीय आमदारांच्या फोरमची स्थापन करण्यात आली. हा फोरम स्थापन झाल्यापासून तर आजतागायत श्री.बी.टी.देशमुख हे या फोरमचे अध्यक्ष आहेत. या फोरमने सर्व बाजूने सांसदिय स्तरावर प्रयत्न केलेत. या सर्व प्रयत्नांचा समग्र आढावा घ्यायचा झाला तर निदान दोन चार पुस्तके प्रकाशित करावी लागतील. "सिंचन अनुशेषाचा संघर्ष" या मथळ्याचे श्री.नितीनजी गडकरी यांनी संपादित केलेले एक असे पुस्तक यापूर्वीच प्रकाशित झाले आहे. घटनेतील तरतुद जिवंत आहे, मा. राष्ट्रपतीचे आदेश जिवंत आहेत. राज्यपाल काही बाबतीत निदेशच काढत नाहीत, काही बाबतीत ते निदेश काढतात पण त्याची अंमलबजावणी होत नाही. हा विषय लोकांच्या समोर निवडणूकीच्या माध्यमातून जाणे व त्याला लोकमताची मान्यता व पाठबळ मिळणे आवश्यक आहे. मी या प्रयत्नाची आज सुरुवात करीत आहे.

### अखिल भारतीय पक्षाचा उमेदवार

**१९.** गेली ३० वर्षे विधानपरिषदेचा सदस्य म्हणून काम करीत असलेला एक सदस्य सहाव्या वेळेला निवडणूकीसाठी उभा असतांना एक अखिल भारतीय पक्ष सोडला तर इतर कोणत्याही राजकीय पक्षाने या मतदार संघात उमेदवार उभा केलेला नाही. मी या सर्व राजकीय पक्षाचा मनापासून आभारी आहे. ज्या अखिल भारतीय पक्षाने माझ्या विरोधात उमेदवार उभा केला आहे तो पक्ष महाराष्ट्रात सत्ताधारी असतांना त्यांनी या विभागाला जी वागणुक दिली त्याबाबतचे काही मुद्दे मी मतदारांच्या लक्षात आणून देवू इच्छितो. निवडणूकीमध्ये प्रचार करतांना उमेदवारांनी उमेदवारावर वैयक्तीक निंदानालस्ती करणारी टिका करणे निंद्य मानले पाहिजे. त्या उमेदवाराच्या किंवा त्यांच्या पक्षाच्या सार्वजनिक प्रश्नाबाबतच्या भूमिका यावर होणारी चर्चा ही स्वागतार्ह मानली पाहिजे. हे बंधन पाळूनच मी याबाबत काही विचार मांडू इच्छितो.

## (१)

**१९.१.** त्यावेळच्या शासनाने "१९९६-९७ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र" दिनांक ३० जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर केले. त्या विवरणपत्राच्या पृष्ठ ६३ वर पाटबंधारे विभागाची एक "लहानशी" मागणी (बाब क्रमांक ८४) सादर करण्यात आली होती. ७१०० कोटी रुपये एकट्या कृष्णा खोऱ्यासाठी द्यावे अशी ती मागणी होती. विदर्भाला किंवा मराठवाड्याला एक छदामसुद्धा त्यातून मिळणार नव्हता. प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात आणि सभागृहाबाहेर या बाबीवर जोरदार टीका केली. १९९६ मध्ये यावर जबरदस्त टीका करणारा 'नुटा बुलेटीन'चा 'अनुशेष विशेषांक' काढला. त्या बुलेटीन मधील पृष्ठ ६६ वरील परिच्छेद १०१ पुढील प्रमाणे :-

"**१०१.** पुरवणी मागणीचे शासनाने नमूद केलेले उपरोक्त स्पष्टीकरणात्मक निवेदन ज्यावेळी मी वाचले त्यावेळी दादाभाई नौरोजी यांनी विलायतेत केलेल्या एका अविस्मरणीय भाषणामधील ते प्रसिद्ध वाक्य मला आठवले. इंग्रज राज्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात "**महम्मद गझनीने १८ स्वाऱ्या करून हिंदुस्थान लुटला असे इतिहासकार सांगतात, पण त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली संपत्ती ही तुम्ही एका वर्षात लुटून नेता तितकी होवू शकली नाही**"

यापूर्वीच्या महाराष्ट्राच्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या ३० वर्षात निर्माण केलेल्या अनुशेषाएवढा (जलसिंचन या विकासक्षेत्रात) अनुशेष निर्माण करण्याचे सामर्थ्य या एका पुरवणी मागणीमध्ये आहे. **यापूर्वीच्या ३० वर्षातील ४२४२ कोटी रुपयांपैकी निदान ९२९ कोटी रुपये विदर्भाला व ११६८ कोटी रुपये मराठवाड्याला मिळाले तरी होते; यापुढे आम्ही मेलो काय किंवा जगलो काय? या ७१०० कोटी रुपयांपैकी एक छदामसुद्धा विदर्भाला किंवा मराठवाड्याला मिळणार नाही.** मात्र ३६०० कोटी रुपयांच्या कर्ज फेडीचे जे उत्तरदायीत्व महाराष्ट्र शासनाने स्वीकारले आहे, त्यात आमचा सहभाग सक्तीचा असेल. आमच्या या पिढीची शक्ती कृष्णा खोऱ्यासाठी ३५०० कोटीचे भागभांडवल उभारून देण्यामध्ये व ३६०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या उभारणीसाठी सहभागी होण्यात खर्ची पडेल. उभारलेल्या या द्रव्यबळातून बिगर अनुशेष जिल्ह्यांमध्ये निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सिंचनक्षमतेचा थंडगार वारा त्या जिल्ह्यात सुटत असतांना मागास जिल्ह्यांमध्ये वाढलेल्या अनुशेषाचा रखरखित व दाहक असा प्रचंड डोंगर शिरावर घेवून आमच्या पुढच्या पिढ्या व्याज व मुद्दलाचे हप्ते फेडण्यात सहभागी व समभागी झालेल्या असतील."

महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात वाढविणारे व कृष्णा खोऱ्याचे हे अनाठायी ओझे शिरावर घेणारे **ते आमचे आदरणीय पाटबंधारे मंत्री या अखिल भारतीय पक्षाचे होते. सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्यांनी ग्रस्त अशा या ५ जिल्ह्यांमध्ये या पक्षाच्या उमेदवाराला पदवीधरांची मते मागतांना निश्चित संकोच वाटेल.**

## (२)

**१९.२.१.** अनुशेष व निर्देशांक समिती ही त्यावेळच्या शासनाने नेमली नव्हती, तर ती मा. राज्यपालांनी नेमली होती. या समितीच्या अहवालाप्रमाणे अमरावती, अकोला (वाशिमसह) व यवतमाळ हे तीन जिल्हे ९ पैकी ९ क्षेत्रात मागास जिल्हे म्हणून निश्चित झाले होते. बुलढाणा जिल्हा हा ९ पैकी ८ क्षेत्रात अनुशेषात असल्याचे त्या अहवालात नमुद होते. या समितीने राज्याच्या सर्व जिल्ह्यांचा एकूण अनुशेष १५३५६ कोटी रुपयांचा दाखविला होता. त्यात अमरावती जिल्ह्याचा अनुशेष १३६१ कोटी रुपये, अकोला १२७२, यवतमाळ

***सतत लागोपाठ सहाव्या वेळी अपक्ष सदस्य म्हणून पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर निवडून जाणारा भारतातील पहिला प्रतिनिधी हा आमचा प्रतिनिधी असेल. हा इतिहास घडविण्यात आपण सर्वचजण सहभागीदार व समभागीदार होऊ या!***

## आयडियल लेजिस्लेटर हे नाव त्यांना दिले पाहिजे. - श्री.रा.सु.गवई

*"सांसदीय पध्दती कोळून पिऊन त्याचा उपयोग कसा करावा,* ***ज्याला आपण आयडियल लेजिस्लेटर म्हणतो ते नाव त्यांना दिले पाहिजे."*** (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ५ डिसेंबर १९८६, खंड ७८, क्रमांक १०, पृष्ठ ५६) *श्री. रा.सु.गवई, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, माजी लोकसभा सदस्य व आर.पी.आयचे अध्यक्ष, केरळचे मा. राज्यपाल.*

१२१० व बुलढाणा जिल्ह्याचा १०८१ कोटी रुपयांचा होता. महत्तम अनुशेष असलेले हे चार जिल्हे होते. प्रत्येकी १ हजार कोटी रुपयांच्या वर या चार जिल्ह्यांचा अनुशेष होता व असे महाराष्ट्रात फक्त हे चारच जिल्हे होते. याशिवाय दुसऱ्या कोणत्याही जिल्ह्याचा अनुशेष १ हजार कोटी रुपयांच्या वर नाही. या समितीच्या अहवालावर शासनाने लवकर कार्यवाही केली तर विदर्भातील या अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचा अनुशेष मोठ्या प्रमाणात दूर होऊ शकला असता. ११ जुलै १९९७ ला या समितीने मा. राज्यपालांना आपला अहवाल सादर केला. जुलै १९९७ मध्येच राज्यपालांनी हा अहवाल **"सदर अहवालाचा अभ्यास करून त्यावरील शासनाचे अभिप्राय मा. राज्यपालांना सादर करावे."** म्हणून शासनाकडे पाठविला. **"निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल व त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या महत्वाच्या मुद्यांबाबत विचार होणे आवश्यक असल्यामुळे मा.मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधितांची एक बैठक घ्यावी."** असे सुरुवातीला ठरले होते. मात्र विदर्भाचा मोठा अनुशेष आहे, वित्त व नियोजनमंत्री विदर्भातील आहेत, तेव्हा याबाबत त्यांनाच अधिकार दिले तर ते लक्ष घालतील व विदर्भाला मोठा न्याय मिळेल असे वाटल्याने मा.मुख्यमंत्र्यांनी असे आदेश दिले की, **"ही बैठक मा.वित्त व नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी."**

**१९.२.२.** दुर्दैवाने विदर्भातील या वित्तमंत्र्यांनी या अहवालावर काहीच कार्यवाही न करण्याचा व निवडणूका होईपर्यंत हा अहवाल उघडसुद्धा होऊ न देण्याचा निर्णय घेतला व तो अमलात आणला. याचा मला सुगावा लागला होता. सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत केलेली अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाची अधिकृत प्रत व्यक्तिशः मला १९९७ मध्येच अनौपचारिकरित्या प्राप्त झालेली होती. या अहवालाने विदर्भाचा अनुशेष ठसठशीतपणे पुढे आणलेला होता हे लक्षात घेऊन त्या अहवालातील जलसिंचन या विकासक्षेत्राशी संबंधित अधिकृत आकडेवारीचा आधार देवून **"महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष : क्ष किरण परीक्षा"** या नावाचे एक पुस्तक मे १९९८ मध्ये मी समारंभपूर्वक अमरावती येथे प्रसिद्ध केले होते. पण तो अहवाल सभागृहासमोर ठेवायला २१ डिसेंबर १९९८ रोजीसुद्धा मंत्री सभागृहात नकार देत होते.

**१९.२.३.** अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणारी कार्यवाही करण्याची गोष्ट तर दूरच राहिली पण अहवालसुद्धा प्रकाशात येवू देणार नाही हा त्यांनी घेतलेला कटू निर्णय विदर्भातील हे वित्तमंत्री गोड भाषेत आम्हाला २१ डिसेंबर १९९८ रोजी सभागृहात सांगत होते. जिव्हाळा आणि ओलाव्याच्या अभावी त्यांच्या गोडव्याला भंपकपणाचा दर्प येत होता. कोरडेपणा व शुष्कपणा त्यांच्या प्रत्येक वाक्यातून ओसंडून वहात होता. त्यादिवशी तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२६ वर झालेल्या अनुपूरक चर्चेतील त्यांच्या उत्तरातील काही अवतरणे पुढील प्रमाणे :-

**"सभापती महोदय, त्या अहवालासंबंधी पूर्ण अभ्यास झाल्यानंतर मग सदनापुढे ठेवण्यात येईल." "ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल."** "याची मला माहिती नाही. हा जो इंडिकेटर समितीने अनुशेषाचा आकडा काढलेला आहे त्याची माहिती मी पटलावर ठेवतो...." **"या समितीने अभ्यास केल्यानंतर त्या समितीचा अहवाल मंत्रिमंडळाच्या समितीकडे येईल आणि त्यानंतर तो अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल."** "हा अहवाल सभागृहापासून लपवून ठेवण्याची या शासनाची कोणतीही इच्छा नाही .. **हा विचार पूर्ण झाल्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर ठेवल्यानंतर तो सभागृहात येईल."**

अहवाल ठेवायला सुद्धा ते तयार नव्हते तेंव्हा त्यांचा निषेध करुन आम्ही सभात्याग केल्याचे अधिकृत प्रतिवेदनात नमुद आहे.

**१९.२.४.** तर आमच्या या विदर्भातील अर्थमंत्र्यांने सत्ता हातून जाईपर्यंत अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल प्रकाशात येवू न देण्याची ऐतिहासिक कामगिरी पार पाडली. पुढे सरकार बदलले. आमचा संघर्ष चालूच होता. मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळाने हा अहवाल सभागृहासमोर ठेवला. मंत्रिमंडळाने त्या अहवालाला मान्यता सुद्धा दिली व याबाबतचा शासननिर्णयही निर्गमित केला. विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते मा.श्री.नितिन गडकरी यांनी प्रकाशित केलेल्या "सिंचन अनुशेषाचा संघर्ष" या पुस्तकाच्या पृष्ठ २४१ वर हा शासननिर्णय प्रकाशित झालेला आहे. आपल्या भागातील मंत्र्यांने काढलेला शासन निर्णय प्रकाशित करण्याचे भाग्य मात्र मा.श्री. नितिन गडकरी यांना मिळू शकले नाही कारण हा अहवाल दडपून ठेवण्याची कामगिरी आमच्या विदर्भातील या मंत्र्यांने मंत्रीपद जाईपर्यंत यशस्वी रीतीने पार पाडलेली होती.....

**ते आमचे आदरणीय पाटबंधारे मंत्री या अखिल भारतीय पक्षाचे होते. सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्यांनी ग्रस्त अशा या ५ जिल्ह्यांमध्ये या पक्षाच्या उमेदवाराला पदवीधरांची मते मागतांना निश्चित संकोच वाटेल.**

### (३)

**१९.३.१. "विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम १९९७"** या नावाचे (सन १९९७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० या क्रमांकाचे) विधेयक शासनातर्फे सादर करण्यात आले होते. विधानसभेत ते मंजूरही झाले. "विधानसभेने दिनांक २४ एप्रिल १९९७ रोजी संमत केल्याप्रमाणे सन १९९७

## ते बोलायला उभे राहिल्यानंतर फाईल रूपी धनुष्यातून रेफरन्सरूपी बाण समोरच्या मंत्र्यावर मारीत असतात. - उपसभापती श्री. सु.र.वहाडणे

*"सभागृहात काही जेष्ठ आणि श्रेष्ठ माणसे आहेत. याठिकाणी मी बी.टी. देशमुखांचा उल्लेख करतो. मला या ठिकाणी कौरव पांडवाच्या युध्दाची आठवण येते. कौरव पांडवांच्या युध्दात कर्णाचा रथ जेव्हा जमिनीत रुतत जातो तेव्हा कर्ण आपल्या रथाचे चाक काढण्यासाठी रथाखाली उतरतो. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचा रथ घेऊन कर्णासमोर येतो. अर्जुन धनुष्याला बाण लावतो तेंव्हा कर्ण अर्जुनाला म्हणतो की जमिनीत रूतलेले माझे रथाचे चाक बाहेर काढू दे. नंतर आपण युध्द करू. त्यावेळी द्रौपदीच्या वस्त्रहरण प्रसंगाची आठवण करून देऊन अर्जुन त्याला 'राधासुता त्यावेळी तुझा धर्म कोठे गेला होता?' अशी विचारणा करतो आणि धनुष्याला बाण लावतो. श्री.बी.टी.देशमुख यांचा भाता सर्व आयुधांनी भरलेला आहे.* ***ते बोलायला उभे राहिल्यानंतर फाईल रूपी धनुष्यातून रेफरन्सरूपी बाण समोरच्या मंत्र्यावर मारीत असतात. एखादा आमदार किती उत्तम प्रकारे काम करू शकतो, किती उत्तम संसदपटू असू शकतो, कोणत्या प्रकारचा तो अभ्यास करतो, हे बी.टी.देशमुखांकडे पाहिल्यानंतर आपणाला दिसून येईल.*** *बी.टी.देशमुख यांच्या प्रश्नांना उत्तर देणे मंत्र्यांना अतिशय अवघड होऊन जाते."*

- (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, बुधवार दिनांक २७ जुलै १९९४, खंड १०२, क्रमांक १३ पृष्ठ क्रमांक १३/७७) *श्री. सु.र.वहाडणे, तत्कालीन उपसभापती, माजी राज्यसभा सदस्य, माजी अध्यक्ष महाराष्ट्र भारतीय जनता पक्ष.*

## मंत्र्याला ते फाडून खायला उभे असल्यासारखे वाटतात - श्री. जयंतराव टिळक

*"सन्माननीय सभासद श्री.बी.टी.देशमुख एका बाजूला असतात व दुसऱ्या बाजूला शिक्षण मंत्री असतात तेव्हा त्यांना ते फाडून खायला उभे असल्यासारखे वाटतात.* परंतु श्री. देशमुख यांच्याबाबतीत हे सुद्धा सांगीतले पाहिजे की, ते फार तयारी करून येतात. प्रत्येक प्रश्नाची फाईल त्यांच्याजवळ असते. प्रश्न केंव्हा विचारला होता, त्या प्रश्नाला मागे काय उत्तर देण्यात आले होते, त्याचे पुढे काय झाले? याबाबत मंत्र्यांच्या फाईलमध्ये माहिती नसते परंतु श्री देशमुख यांच्या फाईलमध्ये ती माहिती असते आणि त्यामुळे श्री.बी.टी.देशमुख यांचे प्रश्न ज्यावेळी असतात त्यावेळी मी माझ्या सेक्रेटरीएटला सांगत असतो की, त्या प्रश्नाच्या संदर्भात मागे जी काही प्रश्नोत्तरे झालेली आहेत त्याची फाईल माझ्या टेबलावर ठेवा. कारण सन्माननीय सभासद नेहमी असे विचारत असतात की, मागे तुम्ही अशा प्रकारे सांगितले होते आणि आता वेगळ्या पद्धतीने सांगत आहात. मागे दिलेली उत्तरे व आता दिलेली उत्तरे यामध्ये फरक आहे. तेव्हा याचा अर्थ काय आहे? या संदर्भात ते नक्की विचारत असतात. अशा रीतीने जेव्हा विचारले जाते तेव्हा यातून सुटावे म्हणून मंत्री आश्वासने देऊन टाकतात. तुम्ही म्हणता आहात म्हणून करून टाकू असे सांगतात." (राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा - महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधान भवन मुंबई यांनी प्रसिद्ध केलेल्या "औरंगाबाद येथे दिनांक १७ व १८ ऑक्टोबर १९८६ रोजी "प्रश्नोत्तराव्यतिरिक्त इतर सांसदीय आयुधे" या विषयावर आयोजित केलेला परिसंवाद" या पुस्तकाचे पृष्ठ ८ पहा) *श्री.जयंतराव टिळक - महाराष्ट्र विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती.*

चे वि.स.वि. क्रमांक २० विचार, खंडशः विचार व पारित करण्यासाठी" दिनांक २५ एप्रिल १९९७ च्या विधानपरिषदेच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात आले होते. विदर्भाचा जलसिंचनाचा अनुशेष दूर होणार म्हणून खालच्या सभागृहामध्ये या विधेयकाचा जयजयकार झालेलाच होता. तो वरच्या सभागृहामध्येही सुरू करण्यात आला. पण या जयजयकारात सुद्धा एक सदस्य ठामपणे सभागृहात प्रतिपादन करीत होता. "अध्यक्ष महाराज, या विधेयकाच्या "उद्देश व कारणाच्या निवेदना"मध्ये "विदर्भामध्ये सध्या दांडेकर समितीच्या अहवालाप्रमाणे जवळ जवळ २ लक्ष हेक्टर क्षेत्राचा अनुशेष असून तो कालबद्ध कार्यक्रमानुसार पूर्ण करण्याच्या दृष्टीने व बांधकामाधीन प्रकल्पातील १० निवडक प्रकल्प येत्या ५ वर्षात पूर्ण करावयाचे ठरविल्यास त्यांना रुपये ३८०० कोटी लागणार आहेत." असे वाक्य आहे पण **प्रत्यक्ष विधेयकात अनुशेष दूर करण्यासंबंधी एक लहानशी सुद्धा तरतूद नाही. अनुशेषाची व्याख्या नाही. अनुशेष दूर करण्याची यंत्रणा नाही" सभागृहात ठामपणाने हे प्रतिपादन करणाऱ्या या प्रतिनिधीचे नाव प्रा.बी.टी.देशमुख असे होते.**

१९.३.२. सभागृहाच्या उभय बाजूचे सदस्य कान टवकारून ऐकायला लागले. विदर्भाचा जलसिंचनाचा अनुशेष दूर करण्याच्या पवित्र व शुद्ध हेतूने आणलेले हे "पाटबंधारे विकास महामंडळ विधेयक" आणि त्या विधेयकामध्ये अनुशेषाबाबत एकही शब्द नाही. एकही वाक्य नाही. हे ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटले. नुसता नकारार्थी विचार मांडून बी.टी.थांबले नाहीत तर त्यांनी "जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनाची अंगभूत व्यवस्था" सुचविणाऱ्या ५ सुधारणा विधेयकाला सुचविल्या होत्या. विदर्भातील जेष्ठ सदस्य श्री. मधुकरराव किम्मतकर यांनी बीटींना पाठींबा दिला. ते म्हणाले "बी.टीं.नी मांडलेल्या विचारांशी मी १०० टक्के सहमत आहे." विदर्भातील दुसरे ज्येष्ठ सदस्य श्री अजहर हुसेन यांनी बी.टीं.च्या दुरुस्त्यांना पाठींबा दिला. ते म्हणाले "सभापती महोदय, माननीय श्री.बी.टी.देशमुखजी ने यहां जो अमेंडमेंट रखी है, वे सारी अमेंडमेंट बहुत महत्वपूर्ण है. मै चाहता हूं की सरकार उन सारी अमेंडमेंटको स्वीकार कर लें, ऐसी मै सरकार से विनती करता हुं और अपने दो शब्द समाप्त करता हूं."

१९.३.३. अनेक सदस्यांनी बीटींच्या दुरुस्त्यांना पाठिंबा देणारी भाषणे केली. विचार आटोपल्यानंतर, सभागृहात खंडशः विचार सुरू झाला. बी.टीं.नी आपल्या "सुधारणा" मांडायला सुरूवात केली. एकएका सुधारणेवर आपले विचार मांडले. **ज्या जिल्ह्यांचा अनुशेष जास्त त्याला निधी जास्त मिळावा हा सुधारणांचा हेतु होता. महत्तम अनुशेष असलेल्या या ५ जिल्ह्यांना थोडा जास्त निधी मिळाला असता.** पाटबंधारे मंत्री विदर्भातले होते. या अखिल भारतीय पक्षाचे होते. त्यांना या सुधारणा मान्य नव्हत्या. सभागृहात येवून युक्तीवादाला तोंड देण्याची त्यांच्यात हिम्मत नव्हती. त्यांनी आपल्या राज्यमंत्र्याला तोंड द्यायला सांगितले. "ही सुधारणा शासनाला स्वीकारता येणार नाही" एवढे एका वाक्याचे उत्तर राज्यमंत्री प्रत्येक वेळी देते होते. विचाराला विचाराने उत्तर येत नव्हते. यांत्रिक उत्तरे येत होती. कोणतेही आश्वासन येत नव्हते. सुधारणा आपण मागे घेणार नाही. असे बी.टीं.नी सांगितले. सभागृहातील तणाव वाढलेला होता. सुधारणेवर बी.टी. नी विभाजनाची मागणी केली. "डिव्हीजन बेल" वाजायला लागली. बेल थांबली व सभागृहाचे दरवाजे बंद करण्यात आले. अनुकूल/प्रतिकूल सदस्यांची मोजणी झाल्यानंतर "सुधारणेच्या बाजूने १९ व विरोधात १९ मते पडली आहेत." असे तालिका सभापतींनी घोषित करताच सभागृहात सन्नाटा पसरला. पुढचेच वाक्य "मला आता कास्टींग व्होट द्यावे लागत आहे. मी सुधारणेच्या बाजूने मत देत आहे......" असे उच्चारत तालिका सभापतींनी "सुधारणा सम्मत झाली आहे." असा निर्णय घोषित केला. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन खंड ११० क्रमांक २२ पृष्ठ १४० शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल १९९७)* एकामागून एक पाचही सुधारणा सम्मत झाल्या. **विधान सभेने सम्मत केलेल्या एखाद्या शासकीय विधेयकाच्या खंडात सुधारणा, हेतुवाक्यात सुधारणा, संपूर्ण शीर्षकात सुधारणा, विधानपरिषदेने मान्य करून एक नवीन इतिहास घडविला होता. एखाद्या अपक्ष सदस्याने शासकीय विधेयकात दिलेल्या सूचना अशा प्रमाणावर सम्मत होण्याचा प्रकार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या इतिहासात यापूर्वी कधीही घडला नव्हता.**

१९.३.४. दुसऱ्या दिवशी २६ एप्रिल १९९७ रोजी विधानसभेत मा. अध्यक्षांनी सभागृहाला असे सांगितले की **"विधान परिषदेकडून एक संदेश आला आहे. सचिव तो वाचून दाखवितील"** त्यानंतर विधानसभेच्या सचिवांनी पुढील संदेश वाचून दाखविला. "महाराष्ट्र विधान परिषद नियमावलीतील नियम १४१ (७) अन्वये कळविण्यात येत आहे की, विधानसभेने सम्मत केलेले सन १९९७ चे वि.स.वि. क्रमांक २० विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ विधेयक १९९७ हे महाराष्ट्र विधानपरिषदेने दिनांक २५ एप्रिल १९९७ रोजीच्या बैठकीत खालील सुधारणासह सम्मत केले" **त्यानंतर सम्मत करण्यात आलेल्या सर्व सुधारणा नमूद करण्यात आल्या होत्या व संदेशाचा शेवट** "या सुधारणांना विधानसभेने सम्मती देण्याची मागणी विधानपरिषदेने केली आहे". २६ एप्रिल १९९७ रोजीच्या कामकाजात असलेल्या या बाबीवर

## विधान परिषदेमधील सगळे संदर्भ त्यांच्या अवती भोवती गर्दी करतात - श्री.प्रमोद नवलकर

*"श्री.बी.टी.देशमुख हे तर आमच्या उमेदवाराचा पराभव करून निवडून आलेले आहेत. त्या ठिकाणी आमचा उमेदवार होता तरीसुध्दा ते निवडून आले आहेत. काही वेळा व्यक्तिमत्व असे असते की, सर्व पक्षाच्या वर ते असते. ते सभागृहात बोलण्यास उभे राहिल्यानंतर ज्ञानगंगा असते. अभ्यास कसा करावा, पाठांतर कसे करावे, जुने संदर्भ कसे चाळावेत हे त्यांच्याकडून शिकावे. श्री.बी.टी.देशमुख ह्या ठिकाणी बोलण्यासाठी उभे राहिल्यानंतर संदर्भासाठी त्यांना डोके खाजवावे लागत नाही.* ***मला कोठेतरी वाचलेले आठवते की, श्री.ग.दि.माडगूळकर हे गीत लिहिण्यास बसावयाचे त्यावेळी त्यांच्या अवती भोवती शब्द गर्दी करत असत*** *व त्यांना सांगावयाचे की "अण्णा आम्हाला तुमच्या काव्यात घ्या." त्याप्रमाणे* ***श्री.बी.टी.देशमुख उभे राहिल्यानंतर विधान परिषदेमधील सगळे संदर्भ त्यांच्या अवती भोवती गर्दी करतात*** *व सांगतात की आमचाही थोडा वापर करावा. यादृष्टीने ते फार भाग्यवान आहेत."*(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ३ डिसेंबर १९९२, खंड ९७, क्रमांक ४, पृष्ठ ६२) *श्री. प्रमोद नवलकर, तत्कालीन विधानपरिषद सदस्य, माजी सांस्कृतिक कार्यमंत्री व शिवसेना नेते.*

# भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा प्रा.बी.टी.देशमुख यांना पाठींबा

महाराष्ट्र विधानपरिषदेकरिता एक सदस्य निवडण्यासाठी अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाच्या येत्या २७ नोव्हेंबर २०१० रोजी होवू घातलेल्या निवडणूकीत नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे (नुटा) अध्यक्ष व अधिकृत उमेदवार प्रा.बी.टी.देशमुख यांना भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कौन्सीलने पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

तसेच भारताचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य समितीच्या दि. २४.१०.२०१० रोजीच्या बैठकीत प्रा.बी.टी.देशमुख यांच्या उमेदवारीला पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर निवडणूकीकरिता पक्षाच्या सर्व जनसंघटना अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये आपल्या समर्थनार्थ प्रचारामध्ये सहभागी होतील

**कॉ. अशोक सोनारकर**
*जिल्हा सचिव, भारतीय कम्युनिस्ट पक्ष*
*अमरावती जिल्हा कमिटी*

*दिनांक १०.११.२०१०*

**कॉ. सुभाष पांडे**
*जिल्हा सचिव, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष*
*अमरावती जिल्हा कमिटी*

भरपूर कामकाज असल्याने २७ एप्रिलच्या पहाटेपहाटे विधानसभेचा निर्णय झाला. विधान परिषदेची ही मागणी विधानसभेत मान्य होवू शकली नाही कारण या विदर्भातील मंत्र्याने सत्ताधारी पक्षाच्या बहुमताचा वापर करून विधानपरिषदेच्या (बी.टीं.च्या) सुधारणा (विदर्भातील महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यांना अनुशेषाच्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देणाऱ्या या सुधारणा) फेटाळून लावल्या होत्या. **ते आमचे आदरणीय पाटबंधारे मंत्री या अखिल भारतीय पक्षाचे होते. सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्यांनी ग्रस्त अशा या ५ जिल्ह्यांमध्ये या पक्षाच्या उमेदवाराला पदवीधरांची मते मागतांना निश्चित संकोच वाटेल.**

## (४)

### *अकोला पूरनियंत्रण योजनेचा भाग असलेला दगडपारवा प्रकल्प*

**१९.४.१.** अकोला पूरनियंत्रण योजनेचा माझ्या सकट विदर्भातील काही विधानमंडळ सदस्यांनी सभागृहात जबरदस्त पाठपुरावा केला. खुद्द विधानपरिषदेतील चर्चेचाच विचार केला तर विधानपरिषद सदस्य श्री. अजहर हुसेन व श्री. बबनराव चौधरी यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. पुरवणी मागण्यांवरील चर्चेत उल्लेख करून अनुपुरक चर्चेमध्ये "इस बारेमे आप मीटिंग क्यो नही बुलाते है?" असा खूपच "साधा" प्रश्न श्री. अजहर हुसेन यांनी विचारला. त्यावर मंत्र्यांनी जे " मिटिंग बुला लेंगे, इसमे कोई हरकत नहीं है." असे सरळ उत्तर दिले. त्यातून हा पाठपुरावा पुढे सुरू झाला. आम्हा प्रतिनिधींना त्यामध्ये चांगलेच यश मिळाले.

**१९.४.२.** "एका बाजूला पूरनियंत्रणापासून गावाचा बचाव करणे व दुसऱ्या बाजूला अकोला शहराच्या वरच्या बाजूला ३-४ लहान लहान सिंचन प्रकल्प तयार करणे" असे या अकोला पूर नियंत्रण योजनेचे एकत्रित स्वरुप होते. प्राचार्य डॅडी देशमुख व तत्कालीन अधिक्षक अभियंता श्री. यादवराव सुर्यवंशी यांनी या कामी खूप मेहनतीने मला कागदपत्रे पुरविली. गुरुत्वाकर्षणाने शहराला पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याची शक्यता व पूरनियंत्रणापासून शहराचा बचाव होण्याची शक्यता यामुळे मी सभागृहात जीवाचा खुपच आटापीटा करुन या योजनेवर मेहनत केली. अकोला पूरनियंत्रण योजनेचे महत्व लक्षात घेऊनच 'नुटा बुलेटीन'चे दोन विशेषांक सुद्धा त्यावेळी काढण्यात आले होते.

**१९.४.३.** दिनांक ४ जानेवारी १९९७ रोजी या योजनेचा भूमिपूजन समारंभ पार पडला. काही पूर्व नियोजित कार्यक्रमामुळे मी त्या दिवशी त्या समारंभाला उपस्थित नव्हतो. माझ्या गैरहजेरीत या जाहीर शासकीय समारंभामध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. गुलाबराव गावंडे यांनी या योजनेच्या पाठपुराव्यातील माझ्या सहभागाबद्दल पुढील उद्गार काढले :- "यामध्ये श्रेय? आता याच्यामध्ये नाव निघाल! बी.टी.देशमुखांच. **वरच्या हाऊसमध्ये जेव्हा प्रश्न यायचा! तेंव्हा आमचे पाटबंधारे विभागाचे सर्व मंत्री- सचिव यांच्या जिवामध्ये धगधग व्हायच. कारण प्रश्न होता बी.टी.देशमुखांचा. बी.टी.देशमुख असा प्रश्न मांडायचे, त्या ठिकाणी, की अक्षरशः भांडण करताहेत, की आता मारतात. एवढी त्यांची तळमळ.** प्रश्न वरच्या सभागृहात चर्चेला आला की आमची आमदार मंडळी सभापती पहिले हासत, बी.टी.देशमुख उभे राहीले की, एवढी तळमळ त्यांच्यात आणि मी तर म्हणतो की हे जे श्रेय आहे याच अर्ध श्रेय मी बी.टी.लाच देतो. मी त्यांच अभिनंदन केलं" *(ध्वनिमुद्रित भाषणावरून शब्दशः मुद्रित)* अकोला मतदार संघाचे आमदार व जिल्ह्यातील राज्यमंत्री श्री. गोवर्धनलालजी शर्मा यांनीसुद्धा या कार्यक्रमामध्ये पुढील प्रमाणे उद्‌गार काढले :-

"आवर्जून उच्चार मी करेल, कारण सत्तेमध्ये असतांना आम्ही काही बोलू शकत नाही. फक्त काम करू शकतो, पण आदरणीय बी.टी.देशमुख यांनी विधान परिषदेमध्ये याचा जोरदार रेटा लावला ..... बी.टी.देशमुख यांच नाव मला आवर्जून घेण भाग आहे, कारण त्यांनी विधानपरिषदेमध्ये अकोला पूर नियंत्रण योजना गाजवून सोडली आणि सरकारला भाग पाडल" *(ध्वनिमुद्रित भाषणावरून शब्दशः मुद्रित)*

**१९.४.४. माझ्या गैरहजेरीत या उभय राज्यमंत्र्यांनी सभागृहात या योजनेसाठी मी केलेल्या धडपडीबद्दल या समारंभामध्ये जाहीरपणे हे जे उद्‌गार काढले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून जाहीरपणे यापूर्वीच आभार मानले होते.** आजची

# बाकी आम्ही स्वतःचे काम करतो पण ते स्वतःचे काम काहीही करीत नाहीत - श्री.विजय सावंत

*"सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख हे अत्यंत अनुभवी असून त्यांच्या बरोबर मी तीन चार वर्षे काम केलेले आहे. **बाकी आम्ही स्वतःचे काम करतो पण ते स्वतःचे काम काहीही करीत नाहीत.** श्री.बी.टी.देशमुख यांनी सभागृहात आपली बाजू आग्रही मांडताना दिलेले रेफरन्स इतके स्पष्ट असतात की, **त्यामुळे सभापतींना देखील त्यांची बाजू घेऊन शासनाला, मंत्र्यांना योग्य त्या सूचना द्यावा लागतात. त्यांना** दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने आदेश द्यावे लागलेले आहेत **की जे आतापर्यंत कोणीही सदस्याच्या बाबतीत असे झाल्याचे आजवर मला या ठिकाणी दिसलेले नाही. श्री.बी.टी.देशमुख यांच्याकडे ते मांडीत असलेल्या वा मांडलेल्या प्रश्नाविषयीची सर्व माहिती जय्यत तयार असते,** त्यासंबंधात यापूर्वी सदनामध्ये झालेली चर्चा, त्यावर मंत्र्यांनी दिलेले आश्वासन आदी सर्व कागदपत्रांची फाईल त्यांनी तयार केलेली पाहिल्यानंतर आपल्याला त्यांच्याकडून खूप काही शिकण्याची संधी आहे हे माझ्यासारख्या नवख्या सदस्याला वाटल्याखेरीज रहात नाही. मंत्रालयातील मंत्र्याकडे इतकेच काय पण अधिकाऱ्यांकडे देखील जेवढी माहिती नसते तेवढी त्या त्या प्रश्नासंबंधीची माहिती बी.टी.देशमुखांकडे तयार असते."* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १०९, क्रमांक ८, पृष्ठ क्रमांक ४३, बुधवार, दिनांक १८ डिसेंबर १९९६) *श्री. विजय सावंत, तत्कालीन विधानपरिषद सदस्य*

# एखाद्या मशीनगन मधून गोळ्या सुटाव्यात तशाप्रकारे त्यांचे प्रश्न चालू असत. - श्री. जयंतराव टिळक

*"बी.टी. ज्यावेळी बोलण्यासाठी उभे राहत त्यावेळी माझासुध्दा श्वास रोखला जात असे. **एखाद्या मशीनगन मधून गोळ्या सुटाव्यात तशाप्रकारे त्यांचे प्रश्न चालू असत. आता नेमके कुठे त्यांना थांबवावे हे मलासुध्दा कळत नसे. आता माझ्यासारख्याची ही अवस्था तर या ठिकाणी बसून उत्तर देणाऱ्या मंत्र्याची काय अवस्था होत असेल** याची कल्पनाच केलेली बरी."* (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, ५ डिसेंबर १९८६, खंड ७८, क्रमांक १०, पृष्ठ ६३) *श्री.जयंतराव टिळक महाराष्ट्र विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती*

एकूण स्थितीच मोठी विचित्र आहे. सामाजिक व राजकीय जीवनामध्ये दुसऱ्या एखाद्याने केलेल्या कामाबद्दल, ते काम खरोखरीच चांगले असले तरी दोन शब्द खाजगीतसुद्धा चांगले बोलण्यात राजकीय नेत्यांना खूपच कष्ट पडतात. मग जाहीरपणे बोलणे तर दूरच राहीले.

**१९.४.५.** जलसिंचन या विकासक्षेत्रातील अकोला जिल्ह्याचा अनुशेष ३० जुन १९८२ रोजी ९२ कोटी रुपयांचा होता, तो ३० जून १९९४ रोजी ९०५ कोटी रुपयांचा झालेला होता. हा महाराष्ट्रातील महत्तम अनुशेष असलेला क्रमांक दोनचा जिल्हा होय. असे असतांना "या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कंसोलिडेटेड फंडातून या कामांसाठी आर्थिक तरतूद करता येईल." असे आश्वासन मा. उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात ७ जुलै १९९५ रोजी दिले. त्याउपरसुद्धा "या योजनेच्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या तरी १९९६-९७ मध्ये निधी उपलब्ध करून देण्यात न आल्यामुळे हे काम सुरु होवू शकले नाही" असे २७ मार्च १९९८ रोजी शासनाने दिलेले अधिकृत उत्तर आहे.

"विदर्भाचा बॅकलॉग भरून काढावयाचा आहे म्हणूनच या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये ३०० कोटी रुपयांची तरतूद ठेवण्यात आली आहे. विदर्भाचा बॅकलॉग दूर करण्यासाठी कोणत्याही प्रकारची कसूर सरकार करणार नाही. या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कंसोलिडेटेड फंडातून या कामासाठी आर्थिक तरतूद करता येईल. असे आश्वासन खुद्द मा. उपमुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर सुद्धा अकोला पूरनियंत्रण योजनेचा भाग असलेल्या दगडपारवा या प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेचा शासननिर्णय १८ नोव्हेंबर १९९५ रोजीच निर्गमित झालेला असतांना आणि प्रशासकीय मान्यतेच्या शासननिर्णयामध्येच "**निधीची मंजुरी मिळाल्याशिवाय या योजनेच्या कामावर कोणत्याही प्रकारचा खर्च करू नये**" असे नमुद असतांना १९९५-९६, १९९६-९७, १९९७-९८ या तीन वर्षात एक रुपयाचा सुद्धा निधी या प्रकल्पाला देण्यात आला नाही? १९९८-९९ मध्ये पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून **१८.९७ कोटीच्या दगडपारवा (अकोला पूरनियंत्रण योजनेचा भाग असलेल्या) या प्रकल्पासाठी फक्त २५ लाख रुपयाची तरतुद करण्यात यावी, एवढा अकोला पूरनियंत्रणाचा दगडपारव्याचा प्रश्न त्यांना किरकोळ वाटला. ते आमचे आदरणीय पाटबंधारे मंत्री व अर्थमंत्री सुद्धा या अखिल भारतीय पक्षाचे होते. सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्यांनी ग्रस्त अशा या ५ जिल्ह्यांमध्ये या पक्षाच्या उमेदवाराला पदवीधरांची मते मागतांना निश्चित संकोच वाटेल.**

## (५)

## *विदर्भाचा जलसिंचन अनुशेष व १९९७-९८ च्या अंदाजपत्रकातील नियतव्ययाचे वाटप*

**१९.५.** सबंध राज्याचा १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयांमध्ये अनुशेष ९२४ कोटी रुपयांचा होता, तो १९९४ मध्ये ८२६५ कोटी रुपयांचा झाला. विदर्भाचा १९८२ मध्ये जो जलसिंचनाचा रुपयांमध्ये अनुशेष ५२७ कोटी रुपयांचा होता तो १९९४ मध्ये ४२६५ कोटी रुपयांचा झाला. या रुपये ४२६५ कोटींमध्ये अमरावती महसुल विभागाचा अनुशेष ३६३० कोटी रुपयांचा आहे. सत्तेवर असतांना या अखिल भारतीय पक्षाने जलसिंचन या विकास क्षेत्रातील हा **अनुशेष दूर करण्यासाठी काय उजेड पाडला ते पहाण्यासारखे आहे. अधिकृत आकडेवारीप्रमाणे १९९७-९८ च्या अंदाजपत्रकांत मोठ्या व मध्यम प्रकल्पासाठी असलेल्या २१०२.३५ कोटी रुपयांच्या नियतव्ययापैकी कृष्णा खोऱ्यासाठी १९०० कोटी रुपयांची वित्तीय तरतुद करण्यात आली व विदर्भासाठी फक्त ७६.४९ कोटी व मराठवाड्यासाठी ७०.५४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली** विदर्भाला विशेषतः सिंचन अनुशेषात असलेल्या या पाच जिल्ह्यांना मोठा मार बसला. **ते आमचे आदरणीय पाटबंधारे मंत्री व अर्थमंत्री या अखिल भारतीय पक्षाचे होते. सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्यांनी ग्रस्त अशा या ५ जिल्ह्यांमध्ये या पक्षाच्या उमेदवाराला पदवीधरांची मते मागतांना निश्चित संकोच वाटेल.**

**२०.** सत्ताधारी असतांना या अखिल भारतीय पक्षाच्या विदर्भातीलच पाटबंधारे मंत्र्यानी त्यांच्या पक्षाचे धोरण म्हणून या ५ जिल्ह्यांना अत्यंत भेदभावपूर्ण वागणूक दिली. हे कागदोपत्री अनेकवार सिद्ध करता येत असले तरी नंतरच्या काळात या पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांनी व काही तरुण सभासदांनी अनुशेष निर्मूलनाच्या कामात तळमळीने भूमिका घेतली हे आदरपूर्वक नमूद केले पाहिजे. व्यक्तीशः सभागृहात प्रादेशिक असमतोलाबाबत विविध चर्चा उपस्थित करण्यात पुढाकार घेणारे सदस्य, सन १९९२ मध्ये जलसिंचन अनुशेषाबाबत नुटा बुलेटीनचा विशेषांक प्रकाशित करुन असमतोलाबाबतच्या लोकांच्या जाणिवा समृद्ध करण्याचा प्रयत्न करणारे सदस्य, ३७१ (२) या कलमान्वये मा. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ रोजी राज्यपालांना विशेष अधिकार प्रदान केल्यानंतर ३० ऑक्टोबर १९९४ रोजी मा. राज्यपालांना विधानपरिषद सदस्य या नात्याने औपचारिक पत्र लिहून त्याच वर्षात (१९९४ मध्ये) विनंती करणारे विधानमंडळाचे एकमेव सदस्य (हे पत्र सन १९९६ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १०४ व १०५ वर त्यावेळी प्रसिद्ध करण्यात आले होते.), कृष्णा खोऱ्यामुळे होत असलेल्या विषम वाटपाबाबत व वाढणाऱ्या प्रादेशिक असमतोलाबाबत १९९६ मध्ये 'अनुशेष विशेषांक' काढून लोकांमध्ये जागृती करणारे सदस्य, "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष क्ष किरण परीक्षा" नावाचे पुस्तक १९९८ मध्ये प्रकाशित करुन वाढत्या असमतोलाबाबत जनजागृती करणारे सदस्य, "अनुशेष निर्मूलन व विकास मंच" या सर्वपक्षीय आमदारांच्या फोरमचे अध्यक्ष असणारे विधानपरिषद सदस्य, १५ डिसेंबर २००१ चे घटनात्मक निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करण्यात यशस्वी झालेल्या सर्व पक्षीय आमदारांच्या फोरमचे नेते, या नात्याने काम करणारे प्रा.बी.टी.देशमुख ही काही फार मोठी व्यक्ती आहे अशातला भाग नाही पण भारताच्या या भल्या थोरल्या नकाशावर विराजमान झालेल्या समृद्ध अशा महाराष्ट्र राज्यामध्ये पसरलेला "अनुशेषाचा अंधार दूर करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेली पणती" हा बहुमान बी.टी.देशमुख यांना कोणीच नाकारू शकणार नाही. काही जाती जमातींना वर्षानुवर्षे मागास ठेवणे हे जसे निकोप राष्ट्राच्या प्रगतीला बाधक असते तसेच राज्यातील काही भागांना वर्षानुवर्षे अनुशेषात ठेवणे हे सुद्धा निरोगी राज्याच्या प्रकृतीला बाधक असते.

**- बी.टी.देशमुख**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

***आपला मतदार क्रमांक व यादीचा भाग क्रमांक या अंकावरील आपल्या पत्त्यावर नमूद आहे.***

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting :**15.11.2010**

To,

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................